




गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : ५३ | सोमवार दि. ०६ जानेवारी २०२५ ते रविवार दि. १२ जानेवारी २०२५ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

## पालकांचा उपदेश ऐकून मुलगा भयंकर बिथरला पोटचा पोरगाच अखेर आई वडिलांचा काळ ठरला






नागपूर/क्राईम रिपोर्टर

ज्या मुलांना आई-वडिलांनी रक्ताचं पाणी करून लहानाचे मोठे केलेले असते त्या मुलांवर अर्थातच आई-वडिलांचा पूर्ण अधिकार असतो. अशावेळी आपल्या मुलाने चांगलं शिक्षण घ्यावं चांगले संस्कार घ्यावे आणि भविष्यात एक चांगला आणि जबाबदार नागरिक बनून भातारपळी आपला आधार बनावा या उद्देशाने आई-वडील आपल्या मुलांना वाढवत असतात. त्यांच्या शिक्षणासाठी त्यांच्या संगोपनासाठी काबाडकष्ट करीत असतात. आपल्या मुलाला कोणत्याही प्रकारचे कमतरता पडू नये यासाठी आई-वडील सतत मेहनत करीत असतात. प्रत्येक आई-वडील आपल्या मुलांमध्ये त्याचे भविष्य बघत असतो. त्यासाठी लहानपणापासूनच मुलाला चांगले वळण लागावे यासाठी प्रयत्न करीत असतो. परंतु दुर्दैवाने आपल्या मुलांसाठी पैसा कमावण्याच्या उद्देशाने दिवस-रात्र मेहनत करणाऱ्या आई-वडिलांना कधीकधी मुलांना पुरेसा वेळ देता येत नाही. आई-वडील दोघेही नोकरदार असले, तर मुलांना वेळ देऊ शकत नाहीत. मुलांना नोकराच्या ताब्यात देऊ बाजूला होतात. कामधंद्यामुळे मुलांकडे त्यांचं लक्ष लागत नाही. मुलांची त्यांचा संवाद रहात नाही. त्याचा परिणाम असा होतो की आई-वडिलांच्या प्रेमाला आणि संवादाला पारखी झालेली मुलं लहानपणापासूनच चुकीच्या मार्गावर जातात, त्यांना वाईट व्यसना लागतात. जेव्हा त्यांना आई-वडिलांची सोबत मिळत नाही तेव्हा मुले वाईट मित्रांच्या नादाला लागतात आणि त्यातून मुलांना दारू जुगार अमली पदार्थांचे सेवन यासारखी व्यसना लागतात. अशी बिघडलेली मुलं भविष्यात आई-वडिलांच्या म्हातारपणाची काठी बनवण्याऐवजी आई-वडिलांसाठी फार मोठी डोकेदुःखी ठरतात. अशा वेळेला या बिघडलेल्या मुलांना आई-वडिलांनी उपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्या तर त्यांना पटकन राग येतो आणि रागाच्या भरात ही बिघडलेली मुलं कोणत्याही थराला जाऊ शकतात. काही बिघडलेल्या मुलांनी तर आई-वडिलांच्या चार गोष्टी ऐकून घेण्याऐवजी त्यांना मारहाण करायला सुरुवात केलेली असते, काही ठिकाणी तर बिघडलेल्या मुलांच्या हातून आई-वडिलांचे मुडदे पडलेले आहेत. नागपूरमध्ये अशाच एका घटनेत इंजीनियरिंग केलेल्या मुलाला नोकरी धंदा कर नाही, तर शेती कर अशा उपदेशाच्या चार गोष्टी त्याच्या आई-वडिलांनी करताच मुलाला भयंकर राग आला आणि रागाच्या भरातच त्याने आई-वडिलांची निर्घृणपणे हत्या केली. मुलाने आई-वडिलांची हत्या केल्याच्या या घटनेने केवळ नागपूरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे.

राज्यात गुन्हेगारीनं कळस गाठला असतानाच नागपूर शहर पुन्हा एकदा खुनाच्या घटनेने हादरले आहे. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी नागपूरात दुहेरी हत्याकांड झाल्याची घटना उघाड झाली आहे. यात चक्क पोटच्या मुलाने आई -वडिलांची हत्या केली आहे. नागपूरच्या कपिल नगर पोलीस ठाण्यातर्गत खसाळा कॅम्पसमध्ये ही घटना घडली आहे. लीलाधर डाखोडे आणि अरुणा डाखोडे अशी मृतांची नावे असून आरोपी हा त्याचाच मुलगा उत्कर्ष डाखोडे आहे. मृतक लीलाधर हे कोराडी थर्मल प्लांटमध्ये तंत्रज्ञ म्हणून काम ...पान ६ वर

## तिसरी मुलगी होताच पतीचे डोके फिरले रागाच्या भरात पत्नीलाच जिवंत जाळले




परभणी/क्राईम रिपोर्टर

**मुलगी आणि मुलगा यात फारसा भेद मानला जात नाही. उलट सध्याच्या जमान्यात मुलांपेक्षा मुलीच आपल्या आई-वडिलांचा जास्त चांगल्या प्रकारे सांभाळ करतात आणि मुलगी कुठल्याही बाबतीत मुलाच्या तुलनेत कमी नसते. त्यामुळेच भारतात मुलीच्या जन्माचा आनंदोत्सव साजरा करावा असे सरकारकडून सांगितले जाते. त्याचबरोबर बेटी बचाव बेटी पढाव यासारख्या योजना राबवून मुलींना मुलांच्या बरोबरीने जीवन जगण्याची संधी दिली जाते. परंतु दुर्दैवाने आजही ग्रामीण भागात मुलगी झाली की कुटुंबातील लोकांना ती मुलगी नकोशी होते आणि या नकोशा मुलीला एक तर उकीरड्यावर फेकले जाते किंवा तिला गर्भातच मारले जाते. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यामधील एका खेड्यात तिसरी मुलगी झाली म्हणून पतीने आपल्या पत्नीला जिवंत जाळल्याची संताप जनक घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.**

आपण २१ व्या शतकात आलो आहोत. मुलगा-मुलगी एकसमान अशा गप्पा केल्या जात आहेत. महिलांना सर्वत्र समान अधिकार दिले जात आहे. परंतु अजूनही मुलगा अन् मुलगी यांच्यातील भेद कायम असल्याच्या घटना अधूनमधून समोर येत असतात. परभणीमधून मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. मुलगी झाली म्हणून पतीने पत्नीला पेट्रोल टाकून पेटवून दिले. माणुसकीला काळीमा फासणारी घटना परभणीत घडली आहे. वडिलांच्या या कृत्यामुळे तीन चिमुकल्यांचे छत्र हरवले आहे. कुंडलिक काळे असे या घटनेतील आरोपीचे नाव आहे. परभणी शहरातील गंगाखेड नाक्याजवळ गुरुवारी ही घटना घडली. या घटनेची आपबिती सांगताना फिर्यादी बहीण भाग्यश्री काळे यांना अश्रू आनावर झाले. त्या म्हणाल्या, मुली झाल्या म्हणून माझ्या बहिणीचा नवरा सतत मारहाण करत होता. तो बहिणीला मुलगा का जन्माला घालत नाही? असे सवाल नेहमी करत होता. तिला मारहाण करत होता. या विषयावरुन गुरुवारी रात्री त्यांच्या दोघांमध्ये भांडण झाली. त्यानंतर त्याने माझ्या बहिणीला पेट्रोल टाकून जाळले. त्यालाही तसेच पेट्रोल टाकून जाळण्यात यावे, किंवा त्याला फाशी देण्यात यावी. तसेच या तीन ...पान ६ वर

## उसने पैसे देऊन खरोखरच फसला वसुली करताना जीव गमावून बसला

नाशिक/क्राईम रिपोर्टर



**उसनवार करताना व्यवहार चौक ठेवावे लागतात, परंतु काही लोकांना पैसे बुडवण्याची सवय असते. एखाद्या माणसाकडून पैसे घ्यायचे आणि देण्याची वेळ आली की टंगळमंगळ करायची. अशाच एका घटनेत दीपक नावाच्या तरुणाने एकाला उसने पैसे दिले होते. परंतु दिलेले पैसे परत मिळत नव्हते. ज्याला पैसे दिले होते तो पैसे परत करण्यास टाळाटाळ करीत होता. यावरून एके दिवशी वाद झाला आणि ज्याने दीपक कडून पैसे घेतले होते त्यानेच दीपक याचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

एखादी अडचण आली की माणूस उधार-उसनवारी करतो. गरजेसाठी पैसे मागतांना माणूस खूपच केविलवाणा होतो, सर्वांकडे हात पसरत फिरतो. एखादा त्याला मदत करतो, त्याची गरज भागते. गरज सरल्यानंतर मात्र तोच माणूस काही वेळा उलटतो. ज्याने मदतीचा हात दिला त्यालाच फसवण्याचा प्रयत्न करतो. गरजेवेळी उसने दिलेले पैसे बुडवण्याचा काही जणांचा प्रयत्न असतो. परत पैसे मागणाऱ्यास ते उर्मट उत्तरे देतात, काही वेळा तर मारहाण करतात. नाशिक जिल्ह्यात उसने दिलेले पैसे परत मागितल्याच्या ...पान २ वर

## सुरक्षा रक्षकाचा खुन करून डॉक्टर पळाला एसएमएसमुळे पोलिसांच्या गळाला लागला

लातूर/राम पाटोळे



**शिकले सवरलेले लोक कधी कधी एखद्या गुन्हेगारासारखे वागतात. पैसा त्यांच्याकडे असतो, पण दुसऱ्याला देण्याची दानत नसते. त्यामुळे त्यांच्याकडे काम करणाऱ्या एखाद्या कर्मचाऱ्याने पगार जरी मागितला तरी त्यांना राग येतो. लातूर मधील अशाच एका घटनेत डॉक्टरकडे काम करणाऱ्या सुरक्षा रक्षकाने पगारातील शिल्लक रक्कम मागितली म्हणून आपल्या साथीदारांच्या मदतीने डॉक्टरने सुरक्षा रक्षकाचा खुन केला. या प्रकरणी पोलिसांनी डॉक्टरला अटक केली आहे.**



लातूर शहरातील रेणापूर नाका परिसरात असलेल्या आयकॉन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या आवारात १२ डिसेंबर २४ रोजी एकच गोंधळ उडाला होता. हॉस्पिटल पासून जवळच असलेल्या इंडिया नगर भागातील डोंगरे कुटुंब जोर जोरात विलाप करून रडत होते. त्यांचा मुलगा बाळू भरत डोंगरे याचा मृत्यू झाला होता. बाळू डोंगरे हा याच हॉस्पिटलमध्ये



सिक्युरिटी गार्ड म्हणून कामाला होता. तो रात्रा १० वाजण्याच्या सुमारास आपल्या पगारीचे पैसे घेण्यासाठी डॉक्टर कडे आला होता. मात्र त्याच्या स्कुटीला अपघात झाला आणि तो उपचारादरम्यान याच हॉस्पिटलमध्ये मयत झाला अशी कुजबूज आयकॉन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या आवारात कुजबूजली जात होती. मात्र मयताची आई ...पान ६ वर

## कर्जामुळे अनंत याचे डोके फिरले रागाच्या भरात पत्नीला ठार मारले

बार्शी/क्राईम रिपोर्टर



**माणसावर कर्जाचा डोंगर वाढला आणि कर्जवाले त्रास द्यायला लागले की मग तो हतबल होतो आणि घरातल्या माणसांवर राग काढतो. बार्शी येथील अनंत याचे सुद्धा असेच झाले. कर्जाच्या ओझ्यामुळे त्याचे पत्नीशी रोज भांडण होऊ लागले आणि एके दिवशी रागाच्या भरात त्याने पत्नीची हत्या केली. तसेच भांडण सोडवायला आलेल्या मुलावर चाकुचे वार केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी अनंतला अटक केली आहे.**

बार्शी शहरातील जावळे प्लॉट येथे अनंत रामचंद्र साळुंखे हे पत्नी मनिषा मुले तेजस आणि समर्थ याचेसह राहयला आहेत.अनंत हे खाजगी शिकवणी घेऊन मुलांना शिकवित असतात. तर त्याची पत्नी मनिषा या गृहिणी आहेत, त्या ही घरखर्च चालविण्यासाठी घरातूनच शिवणकाम करण्याचे काम करीत असत. मुले चांगली आहेत त्यांनी शिकविण्यासाठी त्या धडपडत होत्या. त्यातच अलिकडे साळुंखे यांनी जावळे प्लॉट येथे घर बांधले असल्याने थोडे फार कर्ज ही त्याचे अंगावर झालेले होते. घराच्या कर्जाच्या हप्ते भरता भरता अनंत साळुंखे यांच्या नाकी नऊ आलेले होते.मुले शिकत असताना त्यांना कशाला त्रास दयायचा म्हणून दोघांनी ही मुलांना कर्जाची कोणतीही तोशिस लागू दिलेली नव्हती. खाजगी शिकवणीतून ...पान २ वर

## पार्टीत मित्रांना आग्रह करून फसला समलिंगी तरुण जीव गमावून बसला

नवी मुंबई/क्राईम रिपोर्टर

**आजकालच्या तरुणांमध्ये समलिंगी संबंधाची विकृती मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे. त्यामुळेच मुंबई पुणे सारख्या शहरात गे क्लब, गे एस्कॉर्ट सुरू झाले आहेत. परिणामी अशा विकृतीकडे तरुण वर्ग आकर्षित होत आहे. पण काहींना मात्र समलिंगी संबंधाची घृणा वाटते. नवी मुंबईत थर्टी फर्स्टच्या पार्टीत बोलावून मित्रांना समलिंगी संबंधांना प्रवृत्त करणाऱ्या एका समलिंगीची आणि त्याच्या आईची त्याच्याच मित्रांनी हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**



पनवेलच्या कामोठ्यातील ड्रीम्स हाऊसिंग सोसायटीमध्ये माय लेकरांच्या मृतदेहाचे गूढ अखेर उकलले आहे. याप्रकरणी दोन १९ वर्षीय तरुणांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. कामोठ्यात ड्रीम्ज अपार्टमेंटमध्ये एका घरात आई आणि मुलाचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली होती. मृत गीता यांचा मुलगा जितेंद्र याच्या डोक्यात आणि अंगावर मारल्याचे व्रण असल्याने हत्येचा संशय व्यक्त करण्यात येत होता. पोलिसांनी जेव्हा दरवाजा उघडून जग्गी कुटुंबियांच्या घरात प्रवेश केला तेव्हा घरातील एलपीजी गॅस लिक असल्याचे आढळले होते. त्यानंतर या घटनेचा तपास सुरु करण्यात आला आहे. सोसायटीचे ...पान ६ वर

## रिक्षावाल्याबरोबर पळून गेली पतीनेच पत्नीची हत्या केली

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर



आरोपी गाडेकर

**पुरुष किती जरी कमजोर असला तरी आपली पत्नी दुसऱ्याला लागू आहे हे त्याला कदापि सहन होत नाही. बाळापुर येथे राहणाऱ्या गौतम गाडेकर यांच्या बाबतीतही असेच झाले. गौतम गाडेकर याचा सुखाचा संसार होता. दोन मुलींची लग्न झाली होती. तिसरा मुलगा वीट भट्टीवर काम करायचा. सर्व काही व्यवस्थित असताना त्याची पत्नी तर त्या रिक्षावाल्याबरोबर पळून गेली. हा प्रकार त्याच्यासाठी भयानक होता. मात्र त्याही स्थितीत त्याने तिच्याकडे जाऊन तिची समजूत काढली. त्या रिक्षावाल्याला समजावले आणि पत्नीला परत आणले. मात्र परत आणत असताना वाटेतच दोघांमध्ये वाद झाला आणि या वादात चिडलेल्या गाडेकर याने आपल्या पत्नीची गळा चिरून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी अवघ्या २४ तासात खुनाचा छडा लावला आणि गाडेकर याला ताब्यात घेतले.**

संसारात तोवरच सुख-समाधान असते जोवर पती-पत्नी दोघेही एकमेकाला आधार व आदर देतात. जेंव्हा त्यांच्या मनात एकमेकाबद्दल कटूता येते, ते जोडीदाराचा अपमान ...पान २ वर

## अल्पवयीन मुलांचे शाळेजवळच गँगवॉर हाणामारीत एक जखमी तर दुसरा ठार

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



**आज काल तरुण मुलांना भाईगिरीचे व्यसन जडलेले आहे. खास करून शाळा कॉलेजात शिकणारी मुले ही भाईगिरी करू लागलेली आहेत. शुद्ध गोष्टीवरून जरी त्यांच्यात वाद झाले तरी त्या वादाचे दुश्मनीत रूपांतर होऊन कोण कधी कुणाचा जीव घेईल याचा नेम नाही. इचलकरंजीमध्ये अशाच अल्पवयीन मुलांच्या वादातून प्रसाद डिंगणे नावाच्या मुलाची हत्या करण्यात आली. या प्रकरणी आरोपी सौरभ आणि त्याच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केली आहे.**

हल्लीचे तरूण आणि अल्पवयीन मुले ही गुन्हेगारीकडे वळत आहेत ही खेदाची बाब आहे शाळा कॉलेज परिसरातून दादागिरी करण्याचे पेव सुटत आहे. त्यातूनच मोठया गुन्हेगाराबरोबर लहान सहान गुन्हेगार ही गॅंगवॉरकडे वळत आहेत. इचलकरंजी शहरातील जवाहनगर डेक्कन परिसर हा भाग सवेंदनशील म्हणून ओळखला जातो. तरूण मुले ही मागील भांडणाचा राग मनात धरून खटक्यावर बोट जागेवर पलटी असे मनात धरून एखादयाची गेम करीत आहेत. प्रसाद डिंगणे याचा ही मागील भांडणातूनच गेम झाला. जवाहनगर परिसरातील गणपती कट्टा परिसरात तो आपल्या आई वडिलासह राहयला आहे. त्याचे माध्यमिक शिक्षण हे कबनुर हायस्कुलमध्ये झाले होते. गेल्या वर्षी त्याने तेथून १०वी पास होऊन इयत्ता ११वीसाठी त्याने शहरातील एका नामवंत कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्याच्या घरची परिस्थीती तशी बेताचीच असल्याने तो सहसा कोणाच्या आध्यात मध्यात पडत नव्हता. गणपती कट्टा परिसरातील काही मोजक्याच ...पान २ वर

06 TO 12 JANUARY 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 1/5/2025 6:00 PM Page 1



पान १ वरून...

## उसने पैसे देऊन खरोखरच फसला...

कारणातून एकाला दोघांनी मिळून ठार केले. देवळा तालुक्यातील मटाणे गावात घडलेल्या घटनेचा हा वृत्तांत. मटाणे, ता. देवळा या गावात अंजना नानाजी निक्षे (वय ५३) आणि तिचे कुटुंब कांदा मजुरी करून उदरनिर्वाह करतात. मटाणे हे गाव अंजनाचे माहेर आहे. या गावातच तिचा लहान भाऊ दिपक निंबा साबळे (वय ४५) हाही त्याच्या कुटुंबासह रहाण्यास होता. तो शेती करून त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. अंजनाबाई ही तिच्या घरासमोर रहात असलेल्या आशा लक्ष्मण केदारे या वहिनीकडे बसलेली होते, तेंव्हा तिचा भाऊ दिपक साबळे तिथे आला. त्याने वहिनीला सांगितले की, गावातील छोटू रामदास केदारे हा मला शिव्या देत आहे, तेंव्हा वहिनीने त्याची समजूत काढून त्याला घरी पाठवले. तो निघून गेल्यावर अंजनाबाईही आपल्या घरी निघून गेली. त्यावेळी छोटू केदारे याने दिपक साबळे याला फोन केला आणि फोनवरून तो त्याला वाईट – साईट व अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करू लागला. दिपक त्याला शिवीगाळ करू नको असे पुन्हा–पुन्हा सांगत होता, तरीही तो त्याला शिवीगाळ करतच होता, तेंव्हा त्याने त्याला तू इकडे ये, तुझा बेत पहातो अशी धमकी दिली. तेंव्हा दिपक हा समजावून सांगण्यासाठी छोटूकडे गेला. छोटूच्या घरी जावून दिपकने त्याला समजावले आणि तो घरातून बाहेर पडला. त्याचवेळी दिपकच्या पाठीमागून संतोष बाळासाहेब पवार उर्फ जाब्या हा आला. त्याने त्याच्या हातात असलेल्या धारदार शस्त्राने दिपकसमोर येवून त्याच्या छातीवर वार केला. धारदार शस्त्र छातीत घुसल्याने घाव वर्मी लागला आणि रक्तबंबाळ होवून तो खाली कोसळला. हे पाहून अंजनाबाईने तातडीने रक्तबंबाळ झालेल्या दिपककडे धाव घेतली. दिपक छोटूच्या घराजवळ उताण्या अवस्थेत पडलेला होता. त्याच्या छातीवर डाव्या बाजूला मोठी जखम झाली होती आणि त्यातून रक्त वहात होते. तो काहीच हालचाल करत नव्हता, तेव्हा तुषार निक्षे, केवल साबळे व सचिन वाल्मिक राजगिरे असे तिघे जण जखमी झालेल्या दिपकजवळ आले. तोपर्यंत लोकांची तोबा गर्दी तेथे जमा झाली होती. हे पाहून संतोष बाळासाहेब पवार हा त्याच्या घरात निघून गेला. दिपक यास एका गाडीत टाकून देवळा येथील सरकारी रूग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून तो मयत झाल्याचे घोषीत केले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर जाधव, दिपक पाटील आदींनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळ व मयत दिपक साबळे याच्या मृतदेहाचा पंचनामा केला. अंजना नानाजी निक्षे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून देवळा पोलीस ठाण्याला गुन्हा रजि. नं. १५३/२०२४ ला बी.एन.एस. १०३ (१), ३ (५), ३५१ (२), ३५१ (३), ३५२ कलमाखाली संतोष बाळासाहेब पवार व छोटू रामदास केदारे रा. मटाणे, ता. देवळा या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. दिपक साबळे याला जीवे ठार का मारण्यात आले? याचा तपास पोलिसांनी सुरू केला, तेंव्हा माहिती मिळाली की सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास दिपक निंबा साबळे हा कोमल केवल साबळे आणि गावातील संतोष बाळासाहेब पवार, राहुल अहिरे असे सर्व जण कळवण रोडवरील सम्राट कंट्री लिकर येथे दारू पित बसले होते, तेंव्हा दिपक याचा संतोष उर्फ जाब्या पवार याला उसनवार पैसे दिल्याच्या कारणावरून वाद झाला. दिपक त्याच्याकडे पैसे मागत होता, तर संतोष पैसे देण्यास नकार देत असल्यामुळे दोघांमध्ये चांगलीच जुंपली. त्यानंतर सर्व जण मोटरसायकलने मटाणे गावी आले, मात्र संतोषने शिवीगाळ केल्याचा राग मनात ठेवून दिपक हा छोटू केदारे याच्या घरी गेला. तेथून तो परत येत असतांना जवळच रहाणाऱ्या संतोषने धारदार शस्त्राने त्याच्या छातीवर वार करून दिपकला ठार मारले. संतोषला दिलेल्या पैशाच्या मागणीवरून झालेल्या वादाचा राग मनात ठेवून संतोषने दिपकला ठार मारले. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी संतोष बाळासाहेब पवार व छोटू रामदास केदारे या दोघांना अटक केली. पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली देवळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक पाटील हे करत आहेत.

## कर्जामुळे अनंत याचे डोके ...

अनंत यांना फारसे काही उत्पन्न मिळत नव्हते.जे काही मिळत होते.त्यात बॅकेच्या कर्जाचे हप्ते जात होते. घर खर्च हा कसा तरी मनिषा सांभाळत होत्या. कर्जाच्या ओझ्यांनी त्या ही भेंडाळलेल्या होत्या. घर चालविताना त्यांना नाकी नऊ येत होते. घरातून काम करीत असताना घर खर्चाला आणि कर्जाला थोडे फार हातभार लावावा म्हणून त्यांनीशिवणकामाच्या पैशातून ओळखीच्या दोन तीन ठिकाणी भिशी ही लावलेली होती. त्यातच त्यांनी खाजगी सावकारा कडून ही काही रक्कम व्याजाने घेतलेली होती.ते लोक ही कर्ज मागण्यासाठी घराकडे येत होते.त्यामुळे अनंत आणि मनिषा याच्यात कर्जावरून रोज भांडणे होत होती. मुले ही झोपली की, अनंत हे मनिषा यांना तु भिशी लावलेली आहेस.आणि ते भिशीवाल्याने पैसे परत न देता पळून गेले आहे.त्याचे ही पैसे बुडालेले आहेत.अगोदर कज बाजारी त्यात हे असे म्हणत त्याचे पैसेही मिळत नाही त्यामुळे उलट मी तुझ्यामुळे कर्जात बुडत चाललो आहे. माझे कर्ज फिटेना, उलट मी व्याजात मरत चाललो आहे असे म्हणत तिच्याशी वाद घालत तिला प्रसंगी मारहाण ही करीत होते.त्याचे हे भांडण रोजचेच झाले होते.त्यामुळे मनिषा ही आर्थिक कोंडीत सापडलेली होती. तिचे ही भिशीवाल्यांनी पैसे बुडविल्याने तिला ही काही सुचत नव्हते. त्यातच रोज कर्ज मागणाऱ्याचा ससेमिरा वाढत चालला होता. ते लोक रोज दारात येवून दंगा करीत होते. त्यामुळे शेजाऱ्यात नवरा बायकोची मान खाली जात होते.अनंत हे शिक्षकी पेशाने जगत होते.चार मुलांना ते चांगले शिकवित होते. परंतु स्वतःच्या घराची आर्थिक घडी त्यांना बसवता येत नव्हती. त्यातच त्याचे ही डोके काम देत नव्हते.त्याचेत चिडचिडपणा वाढला होता.त्यांना कशात काय सुचत नव्हते.रात्री उठून सुठून बायको मनीषावर याचा ते राग काढत होते.ती ही त्याचेवर चिडत होती.दोघा नवरा बायकोची भांडणे ही नित्याची झालेली असल्याने घरात शांतता ही नव्हती.नव्याने बांधलेले घर त्या दोघांना ही खायला उठत होते. घरप्रपंचाचा गाडा हा दोघांवर चालत असतो. त्यातच कर्ज वाढले तर कशाचे कशाला होत नसते.घरचा कर्ता पुरूष हा त्या घराचा कॅप्टन असतो.जहाज बुडायला लागले तर कॅप्टनने जहाज सोडायचे नसते तसे त्या घराच्या कत्या पुरूषांचे असते.अनंत हे शिकवणी घेत असताना नेहमी त्याचे शिकवणीत लक्ष लागत नव्हते.त्याचा राग ते पत्नी मनिषावर काढत होते.तिला ही अनंत याचा स्वभाव हा चिडखोर आणि तापट आहे हे माहित असल्याने त्या ही भांडणात पडती बाजु घेऊन गप्प रहात होत्या.त्याच्या ही डोक्यात काही तरी नेहमी विचार घुमत होते.गेल्या दीड एक महिन्यापूर्वी मनिषा आणि त्याचा धाकटा मुलगा समर्थ हे दोघेजण बार्शीत कामानिमीत्य फिरत असताना समर्थ याला आई मनिषा ही तणावाखाली असल्याचे जाणवले. त्याने याचे कारण आईला विचारले असता तिने समर्थला सांगितले की, तुम्ही मुले झोपी गेला ही तुमचे पप्पा हे गेल्या दोन तीन महिन्यापासून कर्जासाठी त्रास देत आहेत.ते मला शिवीगाळ करून मारहाण ही करीत असतात.आता कर्ज झाले आहे म्हणून मी ही काही गप्प बसले नाही. परंतु कर्जाच्या ओझ्याखाली मी आणि तुझे पप्पा दबले गेलेले आहोत. त्यामुळे ते मला टेन्शन देतात त्याचा हा परिणाम आहे.त्यातच मी भिशी लावलेले लोक ही पैसे न देता पळून गेलेले आहेत.त्याचे पैसे ही परत मिळालेले नाहीत तुझे पप्पा म्हणतात की,तु भिशी लावल्याने ते कर्जबाजारी झालेले आहेत.यात माझा काही दोष आहे का? यातून आम्हा दोघांना ही काही मार्ग सापडत नाही.घरावर कर्ज काढलेले असून त्याचे ही हप्ते थकलेले आहेत.त्यामुळे ते मला मारहाण करीत आहेत.मी काय करू बाळा.असे त्या समर्थला म्हणाल्या. त्यातच भिशीवाले पळून गेलेले असले तरी अनंत हे पत्नी मनिषाकडे त्या भिशीचे पैसे मागत होते. त्यातून ते तिला रोज मारहाण करून शिवीगाळ करू लागल्याने मनिषा यांनी सोबतीला आपली बहिण कौशल्या राऊत यांना आपल्या घरी काही दिवसासाठी बोलावून घेतले होते.तरी ही नवरा बायकोत या कारणाने भांडणे होत होती. शुक्रवार दि.२७ डिसेंबर २०२४ रोजी अनंत याच्या डोक्यात काही तरी वेगळेच विचार सुरू होते.त्याचा अंदाज कोणालाच नव्हता. त्यांनी संध्याकाळच्या सुमारास पत्नी मनिषा आणि मोठा मुलगा तेजस यांना आपल्या दुचाकीगाडीवर बसवून नागोबाचीवाडी येथील शेतात नेले. तेथे तेजस समोरच त्यांनी मनिषाबरोबर भांडण काढायला सुरवात केली.त्या भांडणात त्यांनी मनिषा हिचा रागाच्या भरात तिच्याच ओढणीने गळा आवळायला सुरूवात केली.त्या ओरडू लागल्यावर त्याचा मुलगा आईला सोडविण्यासाठी पुढे आला.त्याला अनंत यांनी बाजुला ढकलून दिले. त्यासरशी मनिषा या ही खाली पडल्या.त्यावेळी त्यांनी खाली पडलेल्या मनिषा हिच्या डोक्यावर बाजुलाच पडलेला दगड उचलून घातला. त्यासरशी त्याचे डोके फुटले.एवढयावरच ते थांबले नाहीत तेजस हा परत सोडवायला आल्यावर त्यांनी तेजसवर आपल्याकडील चाकूने त्याच्या हातावर आणि छातीवर सपासप वार केले. मनिषा याच्या डोक्यात दगड घातल्याने त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव होत होता.तरी ही नवरा मुलावर चाकूने वार करीत असल्याचे बघून त्यांनी उठून पुढे येण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी परत अनंत यांनी मनिषावर चाकूने वार केले. आईवर वार होत असताना रक्तबंबाळ झालेला तेजस हा ओरडत पळत तेथून निघून गेला. मनिषावर केलेल्या चाकूच्या वारात तिचा जागीच मृत्यू झाला. त्यावेळी तिच्या मृतदेहाकडे हताशपणे बघत अनंत हे तेथेच खाली मान घालून बसले. त्यांना काही सुचत नव्हते. रागाच्या भरात आपल्याकडून काय घडले याचा ते विचार करू लागले. तोपर्यत घरातून मनिषा, अनंत आणि तेजस बाहेर गेलेले अजून परत आले नाहीत म्हणून संध्याकाळी उशिरा पर्यत त्याचा लहान मुलगा समर्थ हा मावशीच्या सांगण्यावरून बार्शीत त्याचा शोध घेऊ लागला. त्याच दरम्यान संध्याकाळी ६.५०च्या दरम्यान अनंत साळुंखे यांनी मेहुणी कौशल्या राऊत यांना त्याच्या मोबाईलवर फोन करून सांगितले की मी तुझ्या बहिणीला मनिषाला नागोबाचीवाडी येथील शेतात मारून टाकले आहे हे ऐकून तिच्या पायाखालची जमीन सरकली. त्यांनी समर्थला घेऊन नागोबाची वाडी येथील शेतातील घटनास्थळ गाठले. मनिषा ही रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. बाजुलाच रक्ताने माखलेला दगड आणि चाकू पडलेला होता. तर काही अंतरावर गंभीर जखमी होऊन तेजस पडला होता. हे समोरचे दृश्य बघून त्या ही हतबल झाल्या. शेजारी बोरीच्या झाडाखाली अनंत साळुंखे हे खाली मान घालून बसले होते. समर्थने या घटनेची माहिती शेजाऱ्यानां आणि नातेवाईकांना दिल्यावर त्यांनी ही घटनास्थळी धाव घेतली.काही लोकांनी गंभीर जखमी असलेल्या तेजसला उपचारासाठी बार्शीतील दवाखान्यात दाखल केले. कुणी तरी या घटनेची माहिती बार्शी पोलीसांना कळवली.या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेची पाहणी करून पंचनामा केला. मयत मनिषा हिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी बार्शीतील सरकारी दवाखान्यात नेला. ही घटना कोणत्या कारणातून आणि कोणाच्या हातून घडलेली आहे याची माहिती पोलीसांना मिळालेली होती. त्यांनी बाजुलाच बसलेला या घटनेतील संशयीत आरोपी अनंत साळुंखे याला ताब्यात घेऊन बार्शी पोलीस स्टेशनला आणले. त्याच्याकडे या घटनेची पोलीसांना चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर या घटनेची लेखी फिर्याद दवाखान्यात उपचार घेत असलेल्या तेजस सांळुखे (२१) याच्याकडून घेतली.त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार मनिषा अनंत साळुंखे (४५) हिच्या खून प्रकरणी आणि तेजसवर खूनी हल्ला प्रकरणी अनंत रामचंद्र साळुंखे (५०) याच्या विरोधात भादंवी कलम १०३(१) नुसार गुन्हा दाखल करून त्याला बार्शी येथील कोर्टात हजर केले. मा.कोर्टाने अनंत साळुंखे याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांना त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू दगड आणि मोटार सायकल जप्त केले.या घटनेचा पुढील तपास पो.निरी.दिलीप ढेरे याच्या मार्गदर्शनाखाली बार्शी पोलीस करीत आहेत.

## रिक्षावाल्याबरोबर पळून गेली...

करू लागतात, वाईट बोलू लागतात तेंव्हा मात्र संसारातील रामच संपतो. पती असो की पत्नी, दोघातील कोणीही ताळतंत्र सोडले तर संसार संपलाच म्हणून समजा. बुलढाणा जिल्ह्यात एका महिलेने ताळतंत्र सोडला होता. दोन मुलांची लग्ने झालेली, सूना आलेली, नातवंडे झालेली आणि वयाची पन्नाशी गाठलेली विवाहिता पतीला अपमानास्पद वागवत होती, तसेच ती त्याला सोडून एका रिक्षावाल्याबरोबर राहू लागली होती. या सगळ्या प्रकाराने तिच्या पतीच्या मनात तिच्याबद्दल चीड निर्माण झाली होती, तरीही त्याने तिला त्या रिक्षावाल्याकडे जाऊन समजूत काढून परत आणले, पण वाटेतच त्या दोघात वाद भडकला आणि त्याने तिला ठार केले. आपण या प्रकरणात सापडणारच नाही असे त्याला वाटत होते, पण पोलिसांनी अवघ्या २४ तासात त्याला जेरबंद केले आणि एका सी.सी. टी.व्ही. फुटेजमध्ये तो खून करत असल्याचेही दिसून आले. अकोला जिल्ह्यातील बाळापूर गावात गौतम गाडेकर आपल्या परिवारासह रहात होता. तो, त्याची पत्नी कविता आणि तीन मुले असा हा परिवार होता. गौतमच्या दोन मुलांचे विवाह झाले असून ते वेगवेगळे रहातात, तर लहान मुलगा अविवाहित असून वीटभट्टीच्या गाडीवर काम करतो. गौतम मजुरीचे काम करून चरितार्थ चालवत होता. दारूचे व्यसन असलेल्या गौतमचे पत्नी कवितासोबत कधीच पटत नव्हते. ती चार–चौघात नेहमी गौतमला घालून– पाडून बोलायची. अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करायची. पत्नी अशी चार–चौधात बोलत असल्याने गौतमला अपमानास्पद वाटायचे. तिला गौतमने बऱ्याचदा समजावले होते, पण तिच्यात सुधारणा होण्याऐवजी ती अधिक बिघडली होती. नवऱ्याला शिवीगाळ करण्यावरून तिची मजल त्याच्या अंगावर हात टाकण्यापर्यंत गेली तरीही नवरा सर्व काही निमूटपणे सहन करते होता. तिने त्याचा अंदाज घेतला होता. त्याचे आपल्यापुढे काही चालत नाही असे तिला वाटत होते, त्यामुळेच ती मनात येईल तसे बागृत होती. एक दिवस ती अचानक घरातून गायच झाली. ती अचानक निघून गेल्याने गौतम तिची शोधाशोध करू लागला असता समबले की, कविता शेगांव येथील एका रिक्षावाल्यासोबत राहू लागली आहे. कविता आणि तो रिक्षावाला या दोघांनी दहा रूपयाचे दोन हार एकमेकांच्या गळ्यात टाकून लग्न केले. दोन विवाहित मुले, सूना, नातवंडे असलेली कविता परत पन्नासाव्या वर्षी बोहल्यावर चढली. ती आणि तो रिक्षावाला दोघांनीच एकमेकाच्या गळयात हार घालून स्वतःच लग्न लावून घेतले. तिने आवडलेल्या रिक्षावाल्यासोबत नवा संसार मांडला होता, पण शांत बसणार ती कविता कसली? ती त्या रिक्षाचालकासोबत वाद करू लागली. तिकडे तिचं त्या रिक्षावाल्याबरोबर पटत नव्हते, तर ती परक्या व्यक्तीसोबत रहात असल्याने गौतम अस्वस्थ झाला होता. गावात व समाजात बदनामी होत असल्याने गौतमला मान खाली घालावी लागत होती. कविताला एकदा समजावून सांगावे म्हणून तो शेगांव मध्ये आला आणि कविताला भेटला. आपली मुल विवाहित आहेत. त्यांना नातेवाईकात, समाजात, गावात खाली पहावे लागत आहे. जे झाले ते सर्व विसरून माझ्यासोबत घरी चल असे तो तिला समजावून सांगू लागला. त्या रिक्षावाल्यासही गीतमने समजावले. रिक्षावाला जे समजायचं ते समजला, हम दिल दे चुके सनम प्रमाणे स्थानेही कवितास समजावून सागितले. स्वत च्या प्रेमाचा त्याग करून रिक्षावाल्याने कवितास गौतमसोबत घरी पाठवले. रात्री नऊच्या दरम्यान गौतम हा कवितास घेऊन बाळापूरला जाण्यासाठी शेगाव येथून निघाला. मात्र बस नसल्याने दोघे छत्रपती शिवाजी महाराज चौकात आले. परत एकदा मनोमिलन झाल्याने दोघा नवरा बायकोने दारूचे दोन दोन पेग मारले. दोघांवरही दारूचा अंमल वाढत गेला. रात्री अकराच्या दरम्यान अग्रसेन चौकातील कासार यांच्या भांड्याच्या दुकानासमोर ओट्यावर ते झोपण्यासाठी आले. तेथे कविताने नशेत नवऱ्याला अर्वाच्च्य भाषेत शिवीगाळ करून त्याचा चांगलाच पाणउतारा केला. अगोदरच बदनामी झाल्याने गौतम संतापला होता, त्यातच तिची नेहमीसारखी कटकट सुरू झाल्याने त्याच्या रागात भरच पडली. कविताची कटकट कायमची संपवावी असा निर्णय त्याने तिथल्या तिथे घेतला. तो तिला झोप लागण्याची वाट पाहू लागला. काही वेळातच ती नशेत झोपी गेली. तो मात्र जागाच होता. रात्री दोनच्या सुमारास त्याने गाढ झोपलेल्या कविताचा रूमालाने गळा आवडला. ती सावध होण्याआधीच तिला मृत्यूने गाठले होते. ती ठार झाल्याची खात्री होताच त्याने तेथून त्वरित पळ काढला. रात्रीच्या काळोखात आपल्याला कोणीच पाहिले नाही असे त्याला वाटत होते. पण त्याने केलेला सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. सकाळी साडेदहा वाजण्याची वेळ. शेगांव शहरातील अग्रसेन चौकातील देविदास कासार हे भांड्यांचे दुकानाचे मालक व कामगार रामहरी बोरसे असे दुकान उघडण्यासाठी आले. तेव्हा त्यांना ओट्यावर एक महिला झोपलेली दिसली. तिला झोपेतून उठवण्याचा प्रयत्न केला असता ती प्रतिसाद देत नव्हती. ती अनोळखी महिला मरण पावल्याचे लक्षात आल्याने बोरसे यांनी शहर पोलीस स्टेशन गाठून फिर्याद दाखल केली. पोलीस उपनिरीक्षक जाधव, वेळ पोलीस हेडकॉन्स्टेबल वाघमारे यांनी त्वरित घटनास्थळ गाठले. घटनास्थळी अंदाजे ४५ ते ५० वर्षीय महिला मरण पावलेली होती. तिच्या अंगात पोपटी रंगाची डिझाईनची साडी, कथिया रंगाचे ब्लाऊज घातले होते. पोलिसांनी मृतदेहाचे बारकाईने निरीक्षण केले असता मृतदेहाच्या उजव्या हातावर अन्नपूर्णा सौ. कविता गौतम गाडेकर असे गोंदलेले होते. तसेच डाव्या हातावर चार नावे गोंदलेली होती. तिच्या मानेखाली मोठा व्रण दिसल्याने पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांना हा नैसर्गिक मृत्यू नसून तिचा गळा आवळून खून केल्याचा संशय आला. पोलीस स्टेशनला रूजू होताच आठ दिवसात दुसरा खून झाल्याने नितीन पाटील यांच्यापुढे महिलेची ओळख पटवण्यापासून आरोपी अटक करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले होते. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी सईबाई मोटे उपजिल्हा रूग्णालयात पाठवला. तपासासाठी दोन पथके तयार करण्यात आली. मृत महिलेजवळ सापडलेल्या बॅगची पोलिसांनी तपासणी केली असता बॅगेत कपडे व बाळापुर पोलीस स्टेशनला नोंद झालेल्या अदखलपात्र गुन्ह्याची एफआयआर कॉपी सापडली. त्यावर गौतम गाडेकर असे नाव होते, तसेच मृतक महिला शहरातील एका ऑटो चालकाकडे रहात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने पोलिसांनी त्या ऑटो चालकास ताब्यात घेतले. एका पथकाने सी.सी.टी.व्ही. तपासले, तेंव्हा रात्री दोनच्या सुमारास एक इसम तिचा गळा दाबतांना दिसत होता. पोलिसांनी ऑटो चालकाकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, त्याने ती बाळापूर येथील कविता गाडेकर असून सी.सी.टी. व्ही. मध्ये गळा आवळतांना दिसत दिसलेला इसम तिचा नवरा गौतम गाडेकर असल्याचे सांगितले. या माहितीवरून शहर पोलिसांनी दोन तासात बाळापुर येथून दारूच्या नशेत धुंद असलेल्या गौतम गाडेकरला ताब्यात घेतले. पोलीस स्टेशनला आरोपीस घटनेबाबत विचारणा केली असता, आपणच पत्नीच्या वागण्यास कंटाळून तिचा खून केल्याचे गौतम गाडेकरने कबुल करून घडलेला सर्व घटनाक्रम कथन केला. पोलिसांनी चार तासात या प्रकरणाचा उलगडा केला. या प्रकरणाचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक सुनिल कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी विनोद ठाकरे, शेगाव शहर पोलीस स्टेशन ठाणेदार पोलीस निरीक्षकनितीन पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार आयरे, पोलीस हेडकॉन्स्टेबल राहुल पांडे, उज्वल शिंदे करत आहेत.

## अल्पवयीन मुलांचे शाळेजवळच गँगवॉर ...

मित्रांच्या बरोबर त्याची मैत्री होती. कॉलेजमध्ये ही त्याचे मित्र हे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच होते. तसा तो शांत स्वभावाचा असल्याने त्याचे कोणाशी ही भांडण वैगरे काही नव्हते. तरी ही तो राहत असलेल्या परिसरातील शुभम वायकुमार कोळेकर याच्याशी मागे एकदा क्षुल्लक कारणावरून भांडण आणि वाद विवाद झालेला होता.शुभम हा प्रसाद याला कुठल्या ना कोणत्या कारणातून नेहमी त्रास दयायचा. मागे एकदा दोनदा प्रसादने आपले दोन मित्र सौरभ पाटील आणि ओकांर कोरवी याना घेऊन शुभमला दादागिरी करीत त्याला तु आमच्या नादाला लागू नकोस आम्ही कोणाची माणसे आहोत हे तुला माहित नाही तु जर आमच्या वाटेला आलास तर तुझी काही खैर नाही असे सुनावले होते. त्यामुळे शुभम कोळेकर ही त्याचेवर चिडून होता.प्रसादला एकदा धडा शिकवायला पाहिजे याचा तो विचार करीत होता. कारण तो ही एका गॅगमध्ये सामील असल्याने त्याला कशाची भिती वाटत नव्हती. त्याच्या मागे ही काही तरूण मुले असल्याने तो ही दादागिरी करायला मागे पुढे पाहत नव्हता. प्रसाद आणि शुभम याच्याती वाद तसा काही मोठा नव्हता. एका मुलीवरून त्याच्यात वाद झालेला होता. त्यामुळे ते दोघे ही परस्पराकडे वाकडया नजरेने पाहत होते. खरे तर ती मुलगी त्या दोघांना ही दाद देत नव्हती. तरी ही ते दोघे याकारणातून भांडत होते. एकमेकांकडे वाकडया नजरेने पाहत होते. दोघे ही एकमेकाला बघून घेण्याची भाषा करीत असल्याने त्याच्यातील वाद काही केल्या मिटत नव्हता. गुरूवार दि.२६ डिसेंबर २०२४ रोजी दुपार पासूनच कबनुर हायस्कुलचे गॅदरिंग चालू होते. हायस्कुलच्या सध्याच्या मुला मुलीसोबतच आजी माजी मुले मुली ही गॅदरिंग पाहण्यासाठी हायस्कुलच्या मैदानात दुपारपासूनच गर्दी करीत होते. मैदानात होणारी गर्दी पाहून दोन पोलीस ही मैदानात बंदोबस्तासाठी तैनात होते. स्टेजवर मुला मुलीचा नाच गाण्याचा कार्यक्रम चालू होता. प्रत्येक गाण्याला वन्स मोअर मिळत होता. प्रसाद डिंगणे हा त्या हायस्कुलचा माजी विद्यार्थी असल्याने तो ही संध्याकाळच्या सुमारास गॅदरिंग पाहण्यासाठी आला होता. त्या गॅदरिंगमध्ये ती मुलगी ही सहभागी झालेली होती. त्यामुळे प्रसाद हा तेथे येणार हे शुभम कोळेकर याला माहित होते. रात्री ९.३०च्या दरम्यान शुभम हा आपल्या पाच अल्पवयीन मित्रासह हायस्कुलच्या परिसरात आला. त्याने आपल्या एका मित्राला प्रसाद याला फोन कर म्हणून सांगितले. त्या मित्राने प्रसाद याला फोनवरून बाहेर येण्यास सांगितले. प्रसाद ही त्या अल्पवयीन मित्राला ओळखत असल्याने त्याचा फोन आल्यावर तो हायस्कुलच्या बाहेर आला. हायस्कुलच्या कंपाऊड लगत असणाऱ्या छोठया रस्त्यावर अंधारात शुभम कोळेकर आणि त्याचे पाच अल्पवयीन मित्र थांबले होते. प्रसाद तेथे आल्यावर शुभमने प्रसाद याला मागील भांडणाचा जाब विचारला. त्यावेळी त्या दोघात तेथे वादा वादी सुरू झाली. ते पाच सहा जण असल्याचे बघून प्रसादने ही आपला मित्र सौरभ पाटील याला लगेच कबनुर हायस्कुलच्या लगतच्या रस्त्यावर ये. शुभम कोळेकर हा मला त्याच्या पाच सहा मित्रासह दादागिरी करीत आहे असे फोनवरून सौरभ याला सांगितले. आपल्या मित्राला शुभम हा दादागिरी करीत असल्याचे ऐकून सौरभ पाटील हा आपल्या मोटार सायकलीवरून ओंकार कोरवी याला घेऊन तेथे आला. ते दोघे तेथे आल्यावर त्याचेत एकमेकाला शिवीगाळ करीत मारहाण चालू झाली. शुभम कोळेकर हा तेथे आपल्या अल्पवयीन मित्रासह तयारीनेच आला असल्याने ते सर्वजण प्रसादला ओढून मारहाण करू लागले.ते मारहाण करीत असताना त्याच्यात आरडा ओरडा सुरू झाला. कोण कोणाला ओढून मारत आहे हे कळत नव्हते. त्यातच गॅदरिंगमधील गाण्याचा आवाज मोठा असल्याने त्याचे ओरडणे हे निरर्थक होते. शुभम आणि त्याचे मित्र प्रसाद याला मारहाण करीत असताना सौरभ पाटील हा त्यांना आडवायला गेला. तो मध्ये पडल्यावर शुभम याने आपल्याकडील चाकूने प्रसाद याच्या छातीवर आणि बरगडयावर वार केले. त्यासरशी प्रसाद हा खाली पडला. तो परत वार त्याच्यावर करीत असताना सौरभ याने शुभमला आडविले याचा राग शुभमला आला. त्याने त्याच चाकूने सौरभ पाटील याच्या डाव्या हातावर, पाठीवर आणि पायावर सपासप वार केले. त्यात तो ही गंभीर जखमी झाला. प्रसाद हा रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याचा जागीच मृत्यू झाला होता. हे बघून ओकांर कोरवी हा खून खून म्हणत हायस्कुलच्या परिसरात आला. हायस्कुल परिसरात एका तरूणाचा खून झाल्याचे बघून हायस्कुलने गॅदरिंगचा कार्यक्रम ताबडतोब बंद केला. ही घटना हायस्कुल परिसरात गॅदरिंगच्या कार्यक्रमात बंदोबस्तासाठी असलेल्या पोलीसांना समजताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली.तो पर्यत प्रसादवर आणि सौरभवर वार करून शुभम कोळेकर आणि त्याचे साथीदार पळून गेले होते.पोलीसांनी या घटनेची माहिती शिवाजीनगर पोलीसांना देवून गंभीर जखमी असलेल्या सौरभला आणि प्रसादला एका गाडीतून इचलकरंजी येथील इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटलमध्ये दाखल केले.कुणी तरी या घटनेची माहिती जवाहरनगर परिसरात दिल्याने प्रसाद डिंगणे आणि सौरभ पाटील या दोघांचे आई वडिल नातेवाईक आणि मित्रांनी आयजीएम हॉस्पिटलमध्ये गर्दी केली होती.कोणताही अनुचीत प्रकार घडू नये म्हणून शिवाजीनगर पोलीसांनी आयजीएममध्ये आणि घटनास्थळी मोठा पोलीस बंदोबस्त लावला होता.कारण एकाच आठवडयात या पोलीस स्टेशनच्या हद्दीत दोन खूनाच्या घटना लागोपाठ घडल्या होत्या.आयजीएममधील डॉक्टरांनी प्रसाद डिंगणे याचा मृत्यू उपचारापूर्वीच झाला असल्याचे सांगितले.तर गंभीर जखमी असलेल्या सौरभ पाटील याला पुढील उपचारासाठी सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेण्यास सांगितले.तेथे सौरभ पाटील याचेवर उपचार सुरू होते. इकडे घटनास्थळाचा पंचनामा करून पोलीसांनी तपासाला सुरूवात केली होती.प्रसाद याच्याशी कोणाचा वाद झाला होता का? याची माहिती घेत असताना त्यांनी गंभीर जखमी असलेल्या सौरभ पाटील याचा जबाब घेतला.त्याने शुभम कोळेकर याचे नाव पोलीसांना सांगितले. पोलीसांनी तांत्रिक तपास करून आणि हायस्कुल परिसरातील सीसटीव्ही फुटेज तपासले असता त्यात शुभम कोळेकर आणि त्याचे अल्पवयीन मित्र प्रसाद डिंगणे आणि सौरभ पाटील याचेवर चाकूने वार करीत असल्याचे दिसत होते. पोलीसांनी घटनेनंतर अवघ्या काही तासात शुभम कोळेकर आणि त्याच्या चार अल्पवयीन मित्रांना जवाहरनगर परिसरातून ताब्यात घेतले.त्यांना शिवाजीनगर पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता ुभम कोळेकर आणि त्याच्या साथीदारांनी आपला गुन्हा कबुल केला.या घटनेची फिर्याद शिवाजीनगर पोलीसात सौरभ शहाजी पाटील(वय २१) याने दिली असल्याने त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी प्रसाद संजय डिंगणे(वय१७) रा.गणपती कट्टा जवाहगनर इचलकरंजी,आणि सौरभ शहाजी पाटील(वय२१) रा. जवाहरनगर याच्यावर खूनी हल्ला प्रकरणी शुभम वायुकुमार कोळेकर(वय२५) आणि त्याचे अल्पवयीन मित्र याच्या विरोधात भा.दं.वी.कलम१०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायलयात उभे केले.मा.न्यायलयाने शुभम कोळेकर याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.तर चार अल्पवयीन मित्रांची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली.या घटनेतील एका अल्पवयीन तरूणाचा पोलीस शोध घेत होते.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी शुभम कोळेकर याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला.या घटनेचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.

# जळगावमध्ये क्षुल्लक कारणावरून दुकानांसह वाहनांची जाळपोळ, तोडफोड आणि दगडफेक

**नेत्यांचे समर्थकांकडून खासगी मालमत्ताधारकांचे नुकसान; २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल**







**जळगाव/प्रतिनिधी**

संपुर्ण जगभरात सन २०२५ या नववर्षाच्या स्वागताची तयारी सुरु असतांना महाराष्ट्राच्या जळगाव जिल्ह्यातील पाळधी या गावी दुकानांसह वाहनांची जाळपोळ, तोडफोड आणि दगडफेकीची घटना सुरु होती. महाराष्ट्राचे पाणी पुरवठा मंत्री महोदय गुलाबराव पाटील यांच्या पाळधी या गावी अगदी क्षुल्लक कारणावरुन ही दुर्दैवी घटना घडली. विरोधकांना धडा शिकवण्यासाठी नेत्यांचे समर्थक कशा प्रकारे रस्त्यावर उतरुन निष्पाप खासगी मालमत्ताधारकांचे नुकसान करतात याचे हे एक उदाहरण देता येईल. ३१ डिसेंबर मंगळवारच्या रात्री नऊ वाजेच्या सुमारास गुलाबराव पाटील यांचा पुत्राच्या नावावर असलेल्या वाहनातून (कार क्रं. एमएच १९ सीव्ही ८०९०) गुलाबराव पाटील यांच्या सुविद्य पत्नी लाडली गावाहून पाळधी या गावी येत होत्या असे समजते. वाटेत काही तरुणांचा घोळका उभा होता. त्यावेळी वाहनचालक अमोल बागुल याने रस्त्यात थांबलेल्या तरुणांना हॉर्न वाजवून बाजूला होण्याचा इशारा केला. मात्र रस्त्यातील तरुण बाजूला सरकत नव्हते. हॉर्न वाजवून देखील तरुण बाजूला सरकत नसल्याचे बघून वाहनचालक अमोल बागुल हा वाहनातून बाहेर आला. यावेळी कारचालक आणि रस्त्यावरील तरुण यांच्यात वादाची ठिणगी पडली. वाद वाढत असल्याचे बघून मंत्री महोदयांच्या पत्नी तेथून निघून गेल्याचे सांगण्यात येते. दरम्यान या वादाची माहिती मिळताच मंत्री महोदय गुलाबराव पाटील यांचे समर्थक घटनास्थळी दाखल झाले. मंत्र्याचे समर्थक आल्यानंतर तरुणांची टोळी देखील सक्रीय झाली. दोन गट अमोरासमोर येताच वाद वाढत गेला. त्यातून जमावाने दुकानांची तोडफोड व जाळपोळ सुरु केली. याबाबत जावेद पिंजारी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार धरणगाव पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. याविरोधात कारचालक अमोल बागुल यांनी देखील फिर्याद दाखल केली. या जाळपोळीत निष्पाप दुकानचालकांचे सुमारे ६५ लाख रुपयांच्या साहित्याचे नुकसान झाले. एका चप्पल व्यावसायिकाच्या मुलीचा या रात्री हळदीचा कार्यक्रम होता. त्या दुकानदाराचे दुकान आगीत जळून खाक झाले. यात त्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. एका गॅरेज व्यावसायिकाची तीन ते चार चारचाकी वाहने जळून खाक झाली. या घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्यसह सर्वच बड्या पोलिस अधिका-यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. सतर्कतेचा उपाय म्हणून पाळधी गावात २ जानेवारीच्या सकाळी आठ वाजेपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आली. अग्नीशमन दलाच्या बंबांनी आगीवर नियंत्रण मिळवले असले तरी निष्पाप दुकानदारांची ४ टेन ५ दुकाने जळून खाक झाली. अनेक दुकानांची तोडफोड झाली. काही वाहने जळून खाक झाली. या नुकसानीची भरपाई प्रशासनाकडून मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या घटनेप्रकरणी २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सुरुवातीला सात जणांना ताब्यात घेण्यात आले.

# बागेश्वर धाम महाराज धीरेंद्र शास्त्री यांच्या कार्यक्रमात विभूती घेण्यासाठी प्रचंड चेंगराचेंगरी

**कार्यक्रम अर्ध्यावर सोडून धिरेंद्र शास्त्री परतले**



**भिवंडी/प्रतिनिधी**

बागेश्वर धाम महाराज धीरेंद्र कृष्णजी शास्त्री यांच्या हायवे दिवे येथील कार्यक्रमात विभूती घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर चेंगराचेंगरी झाल्याने धीरेंद्र शास्त्री कार्यक्रमा अर्ध्यावर सोडून निघून गेले आहेत.सुदैवाने पोलिसांनी गर्दी पांगवल्याने मोठी दुर्घटना टळली आहे. शनिवारी दुपारी भिवंडीतील दिवे अंजुर येथील इंडियन कॉर्पोरेशन या गोदाम संकुलात धीरेंद्र कृष्णजी शास्त्री यांच्या सस्तंग व दर्शन कार्यक्रमाचे आयोजन दुपारी तीन वाजता करण्यात आले होते. या कार्यक्रमा दरम्यान धीरेंद्र शास्त्री यांनी आपल्या भक्तांना विभूती घेण्यासाठी सर्वप्रथम महिलांना,त्यानंतर पुरुषांना एका रांगेत येण्याचे आवाहन केले. मात्र विभूती घेण्यासाठी स्त्रिया पुरुष यांनी एकच गर्दी केल्याने काही वेळातच गर्दीचा ताण वाढत गेला आणि व्यासपीठावर चढण्यासाठी सर्वांनीच गर्दी केल्याने चेंगराचेंगरी झाली यामध्ये व्यासपीठा वरील शिडीची रेलिंग तुटली त्यामुळे काही महिला खाली पडल्याने गोंधळ उडाला. त्यानंतर परिस्थिती हाता बाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी हस्तक्षेप करीत गर्दी पांगवण्याचा प्रयत्न केला. या गोंधळात धीरेंद्र शास्त्री हे व्यासपीठावरील कार्यक्रम अर्ध्यावर सोडून निघून गेले.सुदैवाने पोलिसांनी वेळीच परिस्थिती हाताळल्याने चेंगराचेंगरी मुळे येथे होणारी मोठी दुर्घटना टळली आहे.

# वाडा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय निवासी श्रमसंस्कार शिबीर



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा एज्युकेशन सोसायटी निर्मित वाडा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड सायन्स, हरोसाळे व राष्ट्रीय सुरखा योजना अंतर्गत सात दिवसीय विशेष शिबीर संपन्न झाले. २४ डिसेंबर ते ३० डिसेंबर या कालावधीत शिबीर बोचलपाडा, डाहे येथे राबविण्यात आले. या सात दिवसात कॅम्पमध्ये अध्यक्ष योगेश गंधे आणि उपप्राचार्य ममता पाटील यांनी प्रत्यक्षात भेट देऊन विध्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच सरकारी वकील अ‍ॅड.हिमांशू पाटील यांनी शिक्षणाचे महत्व प्राध्यापक रामकृष्ण लोहार, भारतीय संस्कृती व युवा, शैला पाटील आणि सुरेश भांगरे (ग्रामीण रुग्णालय वाडा) एच.आय.व्ही, प्रा.ममता पाटील यांनी अंध श्रद्धा निर्मूलन, प्रा. गौरव मोहिते यांनी प्रेरणादायी भाषण केले तर प्रा. सलिना मारले यांनी अंमली पदार्थ हानिकारक, प्रा. तेजस्वी डेंगाणे योगासन एक काळाची गरज,अशा विविध प्रकारचे मोलाचे मार्गदर्शन विध्यार्थ्यांना या सात दिवसीय विशेष शिबीरा मध्ये आयोजित करण्यात आले होते. शिबीरा मध्ये विद्यार्थ्यांनी श्रमदानाच्या माध्यमातून गावच्या विकासासाठी वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबीर, गावाची स्वच्छता, गावातील शाळेत जाऊन विविध स्पर्धा (क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा), गावातील मंदिर स्वछता, नदी स्वच्छता, गावचा सर्वे, विविध प्रकारचे पथनाट्य आणि संस्कृतिक कार्यक्रम याद्वारे गावातील लोकांपर्यंत महत्वाचे संदेश पोहचवले. या सात दिवसीय विशेष शिबीरात गावचे सरपंच वृषाली पाचलकर, उपसरपंच, सदस्य, गावकरी तसेच वाडा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड सायन्स येथील राष्ट्रीय सुरक्षा योजनेचे समन्वयक दीपेश भोईर प्रा. किरण हुंबरे, प्रा. उत्कर्षा जाधव, प्रा. पूनम हरणे, प्रा. सायली ठाकरे, प्रा. निवेदिता पाटील, प्रा. विद्या पष्टे, प्रा. मयुरी रत्नाकर आणि शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी गांगोडा रुपाली, पाटील करण, घेघड दामिनी, आदित्य भानुशाली, लोकेश मोरे, यतीक्षा पाटील, महाले अर्चना, पटेल काव्य, प्राप्ती पाटील यांनी केले. या सर्वात विद्यार्थ्यांना छोटीशी मदत म्हणून कैलास मुतडक (हारोसाळे) यांनी विध्यार्थ्यांना मोफत वाहन सेवा दिली. सात दिवसाच्या श्रमदान शिबिराने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण केली.

# सावित्रीबाई फुले जयंती निमित्त भिवंडीत महिला आरोग्य शिबिर संपन्न



**भिवंड/प्रतिनिधी**

पहिल्या स्त्री शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ जयंती निमित्त भिवंडी महानगरपालिका वतीने महिला मेळावा व महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करून साजरा करण्यात आला. राजय्या गाजंगी सभागृहात आयोजित या कार्यक्रमाचा शुभारंभ पालिका आयुक्त तथा प्रशासक अजय वैद्य यांच्या शुभहस्ते पालिका अतिरिक्त आयुक्त देविदास पवार, विठ्ठल डाके, उपायुक्त बाळकृष्ण क्षिरसागर, शैलेश दोंदे, प्रणाली घोंगे, डॉ.अनुराधा बाबर, शहर अभियंता जमिल पटेल, यांसह मोठ्या संख्येने पालिका महिला कर्मचारी व शहरातील बचत गटातील महिला सहभागी झाल्या होत्या. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीयां बद्दलची चुल व मुल ही भावना मोडीत काढून स्त्री शिक्षणाचा पाया रुजविला.स्त्रीयांना शिक्षित करीत त्यांना सन्मानाचे जीवन मिळवून दिले, त्यामुळे आधुनिक काळातील स्त्रीयांचीही संपूर्ण जीवनशैलीच बदलून टाकली असल्याने महिलांनी त्यांचा आदर्श ठेवावा असे प्रतिपादन आयुक्त अजय वैद्य यांनी केले. या कार्यक्रमा दरम्यान महिला कर्मचारी यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले तर जिल्हा रुग्णालयातील दंत शल्यचिकित्सक डॉ अर्चना पवार यांच्या नेतृत्वाखालील वैद्यकीय पथकाने तब्बल ५००हुन अधिक महिलांची आरोग्य तपासणी या वेळी केली.

# नकली सोन्याचा हार विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या परराज्यातील आरोपी पोलिसांच्या ताब्यात



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

बनावट/नकली सोने खरे असल्याचे भासवून, फसवणूकीचा प्रयत्न करणाऱ्या ४ परप्रांतीय आरोपीना सोलापूर शहर गुन्हे शाखेने अटक केले आहे. ३१ डिसेंबर २०२४ रोजी गुन्हे शाखेकडील सपोनि विजय पाटील व त्यांचे तपास पथकास गोपनीय बातमी मिळाली की, एका महिलेस अन्नपुर्णा स्वीट, पद्मानगर, सोलापुर येथे येऊन, काही परप्रांतीय आरोपी हे नकली सोने विक्री करणार आहे. त्याअनुषंगाने सापळा रचुन आरोपी आण्णाराम बाबुजी सोलंकी (२३), करण सेलाराम परमार (१९), दरगाराम प्रागाराम (३९) व लखाराम सुनाजी दाबी (५५) सर्व राहणारे राजस्थानचे हे सोन्या सारखा दिसणारा नकली हार विक्री करुन एका महिलेची फसवणुक करण्याच्या प्रयत्नात असताना त्यांना शिताफीने ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांचेकडुन नमुद नकली सोन्यासारखा दिसणारा १ किलो ७०० ग्रॅम वजनाचा हार तसेच गुन्हयात वापरलेला मोबाईल फोन व २ मोटार सायकल असा मुद्दमाल हस्तगत केला. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सपोनि विजय पाटील व त्यांचे तपास पथक यांनी आरोपी जगन्नाथ मल्लिनाथ कोळी, हणमंतु राजु चौगुले, शितल किसनसिंग शिवशिगवाले, विवेक गोविंदराज बेत व प्रसाद नारायण देवगण यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन खालील नमूद मोटार सायकल व मोबाईल चोरीचे ४ गुन्हे उघडकीस आणले. अशा प्रकारे, गुन्हे शाखेकडील सपोनि विजय पाटील व त्यांचे तपास पथकाने, फसवणुकीचा प्रयत्न १ आणि चोरीचे ४ गुन्हे असे एकुण ५ गुन्हे उघडकीस आणून ०२,०६,०००/-रू किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदरची कामगिरी सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त गुन्हे वि.शा, डॉ दिपाली काळे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे राजन माने, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विजय पाटील व पोलीस अंमलदार राहुल तोगे, आबाजी सावळे, अजिंक्य माने, धिरज सातपुते, विठ्ठल यलमार, चालक सतीश काटे, काळे व सायबर पोलीस ठाणेकडील मच्छिंद्र राठोड व प्रकाश गायकवाड यांनी केली आहे.

# उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांच्या हस्ते श्री सिद्धेश्वरांची पूजा

**लातूर/प्रतिनिधी**

लातुरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांनी नववर्षानिमित्त ग्रामदैवत श्री सिद्धेश्र्वरांचे दर्शन घेऊन पूजा व महाआरती केली. देवस्थानच्या वतीने प्रकाशित केला जाणाऱ्या दिनदर्शिकेचे प्रकाशनही यावेळी त्यांच्या हस्ते करण्यात आले. श्रीमती रोहिणी नऱ्हे यांचा यावेळी देवस्थानच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी प्रशासक सचिन जांबुतकर, नायब तहसीलदार सुधीर देशमुख, महाआरती विभाग प्रमुख विशाल झांबरे, तलाठी दत्ता शिंदे, आशिष साठे, सचिन आलमले, तुकाराम जगताप, अनिकेत जाधव यांच्यासह महाआरती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. देवस्थानच्या वतीने दर सोमवारी श्री सिद्धेश्वरांची महाआरती केली जाते. मागील वर्षभरापासून महाआरतीचा उपक्रम अखंडितपणे सुरू आहे. भक्तांचा या उपक्रमाला चांगला प्रतिसाद लाभत आहे. यापुढेही हा उपक्रम सुरूच राहणार असल्याचे महाआरती समितीच्या वतीने यावेळी सांगण्यात आले. श्रीमती नऱ्हे यांनी देवस्थानच्या परिसरात पुरातत्व खात्याच्या वतीने संवर्धित केल्या जाणाऱ्या तीर्थकुंडाची पाहणी करून कामासंदर्भातही सूचना केल्या.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक १३० सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील **नोंदणीकृत कंत्राटदार** यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दि. ०७/०१/२०२५ ते २१/०१/२०२५ सकाळी ११.०० ते संध्या. ४.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरन पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

फटिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण १० (दहा) कामे समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://www.paytopwd.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | बोरीगाव नांगरपाडा अंतर्गत रस्ता तयार करणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८,१५,७५४/- | डोंगरी विभाग विकास कार्यक्रम |
| २. | बोरीगाव तांबोलपाडा अंतर्गत रस्ता तयार करणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८,१०,२८१/- | डोंगरी विभाग विकास कार्यक्रम |
| ३. | वेवजी काटेलपाडा अंतर्गत रस्ता तयार करणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८,१७,७२४/- | डोंगरी विभाग विकास कार्यक्रम |
| ४. | उपविभागीय अधिकारी कार्यालय डहाणू संरक्षण भिंतीचे दुरुस्ती करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८,१६,९६९/- | २२२५-अनुसूचित जाती अनुसुचित जमाती |
| ५. | उपविभागीय अधिकारी कार्यालय डहाणू येथील उपविभागीय अधिकारी यांच्या दालनाची दुरुस्ती करणे. नवीन फर्निचर व उपविभागीय अधिकारी कार्यालय येथील नवीन पाण्याची पाईप लाईन बसविणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८,३३,१०७/- | २२२५-अनुसूचित जाती अनुसुचित जमाती |
| ६. | ग्रामपंचायत सावटा अंतर्गत नानु माच्छी ते दिलीप माच्छी यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८,०४,३१७/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| ७. | ग्रामपंचायत सावटा अंतर्गत प्रविन यांच्या वाडीपासून ते मनोज धोडी घरापर्यंत रस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७,८६,९०१/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| ८. | ग्रामपंचायत सावटा अंतर्गत मुख्य रस्ता ते पिंटु महालवाडी मेलवाला यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७,८३,१३९/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| ९. | ग्रामपंचायत सावटा अंतर्गत विनोद डोलारी ते दिनेश दसवत यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७,९५,०७४/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| १०. | वाकी स्मशानभूमी रस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ७,९६,४०१/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. ०७/०१/२०२५ ते दि. २१/०१/२०२५ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. २४/०१/२०२५ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर

**जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/१३१७३**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम)-४०१ ४०४.
दिनांक : ३१/१२/२०२४

**सही/-**
**(स.प्र. पाटील)**
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/२६४**

06 TO 12 JANUARY 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 1/5/2025 6:01 PM Page 1



# पुन्हा सोयरीक!

राजकारणात कुणी कुणाचा कायमचा मित्र किंवा कायमचा शत्रू नसतो. आज एकमेकांचे शत्रू असलेले उद्या सत्तेसाठी कधी एकत्र येतील आणि राजकारणाची दिशा बदलून टाकतील याचा नेम नाही. सध्या असाच काहीसा प्रकार महाराष्ट्राच्या राजकारणात बघायला मिळत आहे. याचे कारण उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि भाजपा यांच्यात पुन्हा सोयरीक जुळण्याचे चित्र निर्माण झाले आहे. वास्तविक शिवसेना भाजपाची महाराष्ट्रात २३ वर्ष युती होती. आणि या युतीने सत्तेत राहून, तसेच सत्तेच्या बाहेर राहूनही बरीच चांगली काम केली होती. परंतु इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, पोर्तुगीज यांचा जसा जगामध्ये साम्राज्यवाद सुरू होता. अगदी तसाच साम्राज्यवाद भाजपाच्या लोकांनी सुरू केला होता. राज्यांमधील प्रादेशिक पक्षांशी मैत्री करायची. आणि त्या त्या राज्यात आपल्या पक्षाचा विस्तार वाढवायचा. आणि एकदा का त्या राज्यात पक्षाची पाळीमुळे घट्ट रुजली की, ज्यांच्यामुळे आपला पक्ष मोठा झाला त्या पक्षालाच लाथ मारायची. असे एक धोरण भाजपाचे आहे. भाजपाने अशाच प्रकारे अनेक पक्षांना संपवून टाकले. शिवसेनेच्या बाबतीत सुद्धा तसेच केले होते. विधानसभा निवडणूक जिंकल्यानंतर उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपदाचा शब्द दिला होता. परंतु तो भाजपाने पाळला नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे काँग्रेस आघाडीबरोबर गेले आणि मुख्यमंत्रीपद मिळवलं. परंतु त्यांची सत्ता काय फार काळ टिकली नाही. अडीच वर्षातच भाजपाने शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन मोठे पक्ष फोडून आपले सरकार बनवले. हा सगळा इतिहास आहे. परंतु राजकारणात फाटाफुटीचे असे अनेक इतिहास यापूर्वी घडलेले आहेत. फाटा फूट करायची आणि पुन्हा सत्तेसाठी एकत्र यायचे. हे प्रकार राजकारणात काही नवीन नाही. त्यामुळे आताही असाच काहीसा प्रकार सुरू झालेला दिसतोय. देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी त्यांची भेट घेतली. त्यानंतर ज्या फडणवीसांना सामनातून दर दिवशी अत्यंत शेलक्या शब्दात टीका केली जायची. त्याच फडणवीसंवर आजकाल सामनातून स्तुती सुमने उधळली जात आहेत. याचा अर्थ स्पष्ट आहे. ठाकरेंची शिवसेना पुन्हा एकदा भाजपाच्या जवळ जात असून, त्यांच्यामधे नव्याने सोयरीक निर्माण होत असल्याचे चित्र सध्या महाराष्ट्रात बघायला मिळते आहे. पण असे जर झाले तर काय होईल? उद्धव ठाकरे यांच्या विषयी महाराष्ट्रातील जनतेच्या मनात जो आदर निर्माण झाला होता, जी आस्था निर्माण झाली होती.. ती कदापि राहणार नाही. याचे कारण गेल्या अडीच वर्षात शिवसेना आणि भाजपा यांच्यात भारत पाकिस्तान पेक्षाही शत्रुत्व निर्माण झाले होते. रोज उठून संजय राऊत भाजपा विरुद्ध काही काहीना काही बोलायचे आणि भाजपवाले ही त्याच भाषेत त्यांच्यावर टीका करायचे. एवढं सगळं होऊनही जर शिवसेना पुन्हा भाजपच्या सोबत गेली, तर मात्र या राजकारणात कुठल्याही पक्षाकडे काडीमात्र ही नीतिमत्ता राहिलेली नाही असेच म्हणावे लागेल. वास्तविक उद्धव ठाकरेंना एक गोष्ट कळायला हवी की, भाजपच्या लोकांनी त्यांची शिवसेना फोडली . फुटिरणा बळ दिले सत्तेत सोबत घेतले.त्यामुळे आज शिंदेंच्या शिवसेनेचे वेगळे आणि मजबूत अस्तित्व निर्माण झालेले आहे. शिंदेंना अडिज वर्ष का होईना मुख्यमंत्रीपद मिळाले.त्यामुळे शिंदेंची शिवसेना आज ठाकरेंच्या शिवसेनेपेक्षाही बलशाली बनत चालली आहे .या उलट ठाकरेंच्या शिवसेनेचा महाराष्ट्रातील जनाधार हळूहळू घसरत चाललेला आहे. लोकसभा निवडणुकीत भलेही महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या शिवसेनेला बऱ्यापैकी यश मिळालेले असले तरी, त्यांची विधानसभा निवडणुकीत मात्र वाताहात झालेली आहे. अशा वेळी पुन्हा जर उद्धव ठाकरेंनी भाजपच्या सोबत जाण्याचा प्रयत्न केला तर महाराष्ट्रातील जनतेचा खास करून मराठी माणसांचा उद्धव ठाकरेंवर जो थोडाफार विश्वास आहे तो पूर्णपणे उडून जाईल. आणि त्याचे परिणाम ठाकरे सेनेला भोगावे लागतील. या गोष्टीचा कधीतरी उद्धव ठाकरेंनी विचार करायला हवा. भाजपची नजर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर आहे. खास करून मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूकिवर भाजपाचा डोळा आहे. आणि कोणत्याही परिस्थितीत भाजपाला मुंबई महापालिका जिंकायची आहे. परंतु आजही मुंबईत ठाकरेंच्या शिवसेनेचा बऱ्यापैकी प्रभाव आहे. त्यामुळे ठाकरेंच्या विरोधात मुंबई महानगरपालिका जिंकणे वाटते तितके सोपे नाही. आणि हेच लक्षात ठेव देवेंद्र फडणवीस आणि भाजपातील चलाख नेत्यांनी ठाकरेंना पुन्हा सोबत घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. परंतु त्यात त्याला कितपत यश येईल हे सांगता येत नाही. अर्थात त्यांचे प्रयत्न तर सुरूच आहेत. पण अशा पद्धतीचं घाणेरडे राजकारण लोक कदापि सहन करणार नाहीत. कारण राजकारण जर इतके रसा तळाला गेलेले असेल तर लोकांचा आता राजकारणावर कवडीचाही विश्वास राहणार नाही. आणि जे लोक आज उद्धव ठाकरेंच्या सोबत आहेत ते त्यांची साथ सोडून, एक तर दुसऱ्या पक्षात जातील. किंवा राजकारण सोडून देतील .म्हणूनच उद्धव ठाकरे यांनी भाजपा पासून चार हात लांब राहणे आवश्यक आहे. कारण उद्धव ठाकरेंनी एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की भाजपामुळेच शिवसेनेची वाताहात झालेली आहे. आणि यातून सावरणे वाटते तितके सोपे नाही. शिवसेनेला पुन्हा एकदा नव्याने सुरुवात करायची असेल तर, महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास कायम ठेवूनच त्याना स्वबळावर किंवा महाविकास आघाडीच्या मदतीने राजकारणात स्वतःला सिद्ध करावे लागेल. परंतु त्यांनी तसे केले नाही तर ठाकरेंच्या शिवसेनेचे अस्तित्व जराही राहणार नाही कदाचित तो त्यांचा आत्मघाती निर्णय ठरू शकेल.

## परिवहन मंत्र्यांनी पालघर जिल्ह्यातील एसटी आगाराचीही पाहणी करावी!

**पालघर/प्रतिनिधी**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्री मंडळात ठाण्यातून परिवहनमंत्री म्हणून प्रताप सरनाईक यांची मंत्रीमंडळ पदी निवड झाली आहे. परिवहन मंत्र्यांनी नुकतीच ठाण्यातील खोपट एसटी आगाराची पाहणी केली. तेथील आगाराच्या गैर व्यवस्थेसंबंधी काही सुविधा निर्माण करण्याची घोषणा केली. ओवळा-माजीवडा या विधानसभा क्षेत्रातील मिरा-भाईंदर महापालिकेच्या क्षेत्रातील भाईंदर पश्चिमेकडील एसटी आगाराचा विकास करण्यात येणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी नजिकच्या पालघर जिल्ह्यातील वसई-विरार आठ एसटी आगारांची देखील माहिती घ्यावी व शक्य झाल्यास पाहणी करावी. कारण या तालुक्याची लोकसंख्या तीस लाखांवर गेली असून येथे सार्वजनिक वाहतूक असून नसल्यासारखे आहे. महापालिका स्थापन झाल्यावर एसटी आगारातून एसटीची शहराअंतर्गत सेवा कमी करण्यात आली. फक्त लांब पल्ल्याच्या गाड्या राज्यात, कोकणात, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र अशा धावतात. मात्र वसई तालुक्याच्या पूर्व पट्टीतील ठाणे, भिवंडी या मार्गावर देखील बसेस फार कमी धावतात. त्यातच येथील आगारात असलेल्या बसेसमधून काम चलाऊ वगळता किती बसेस कार्यरत आहेत. निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांमधून आगारात किती कर्मचारी उपलब्ध आहेत. आगार व्यवस्थेत किती बसेस धावण्याची गरज आहे. शहराअंतर्गत बससेवा वाढवावी कारण पालिकेची परिवहन सेवा गेली काही वर्षे नाममात्र आहे. त्यामुळे नागरिकांना भरमसाठ भाडे घेणाऱ्या रिक्षा वाहतुकीवर अवलंबून रहावे लागते. ग्रामीण दुर्गम भागात प्रवाशांअभावी बसेस कमी धावतात. कारण एसटी तोट्यात चालवावी लागते. म्हणून आगार थोड्याफार प्रवाशांना वाहतूक सेवा देत नाही. लांब पल्ल्याच्या बसेसमधून वाढीव भाडे देऊन आदिवासी व कष्टकरी प्रवाशांना लांब पल्ल्याच्या गाड्यांतून भिवंडी, ठाणे, कल्याण अशा मार्गावर आपल्या कामाच्या ठिकाणी किंवा आदिवासी पाड्यावर जाण्यासाठी पैसे मोजावे लागतात. एसटीच्या अनेक बसगाड्यांची अवस्था वाईट आहे. छोट्या बागायतदार शेतकर्यांना पहाटे शेतातील भाजीपाला शहरातील मार्केटमध्ये वाहतूक करण्यासाठी एसटी बस उपलब्ध नाही. अर्नाळा एसटी आगारातून धुळे, जळगाव, नाशिक, चोपडा, शिर्डी या गाड्या सकाळी सोडल्या जात होत्या आता त्या सुरु आहेत की नाही हे देखील प्रवाशांना माहित नाही. ठाणे आणि भिवंडीला जाण्यासाठी सकाळी अर्नाळा, वज्रेश्वरी, भिवंडीमार्गे एक-दोन बसेस आहेत. तर घोडबंदरमार्गे ठाणे जाणाऱ्या बसेस देखील आहेत. वज्रेश्वरी, गणेशपुरी या तीर्थक्षेत्राला जाण्यासाठी ग्रामीण भागातून बसची व्यवस्था नाही. एसटी मध्ये महिलांना तिकिट प्रवासात निम्मे भाडे आकारले जाते. हा सरकारचा सुत्य निर्णय त्या व्यतिरिक्त सरकारने खासगी वाहतुकीला पर्याय म्हणून एसटीची सेवा पुन्हा वाढवावी; तर वसई विरार महापालिका क्षेत्रात पालिका परिवहन सेवा जोपर्यंत मोठ्या प्रमाणात गतिमान होत नाही. तोपर्यंत एसटीची सेवा पुरेशी उपलब्ध झाली पाहिजे. तसेच एसटीच्या जागेवर किंवा शेजारी नागरीकांना पे आणि पार्कची सेवा उपलब्ध झाली पाहिजे अशी मागणी फुले, शाहु, आंबेडकर विचार मंचाचे उमाकांत वाघ यांनी केली आहे.

## 'उत्तन ते विरार सागरी सेतू' १५ दिवसांत सविस्तर आराखडा सरकारकडे मंजुरीसाठी


**मुंबई/प्रतिनिधी**



मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) उत्तन, भाईंदर ते विरार दरम्यान ५५ किमी लांबीचा सागरी सेतू बांधण्याचा निर्णय घेतला असून या प्रकल्पासाठीच्या सविस्तर प्रकल्प आराखड्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. हे काम लवकरच पूर्ण होणार असून येत्या १५ दिवसांत हा आराखडा मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठविण्यात येईल. मुंबईतील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि अतिवेगवान प्रवासासाठी सागरी सेतू आणि सागरी किनारा मार्ग बांधण्यात येत आहेत. पालिकेकडून प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल- वांद्रे वरळी-वरळी सागरी सेतूच्या दक्षिण टोकापर्यंत सागरी सेतू बांधला जात आहे. तर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू बांधला जात आहे. या सागरी सेतूचा वर्सोवा-विरार आणि पुढे पालघर असा विस्तार 'एमएमआरडीए' जाहीर करणार होती. यासाठी प्राधिकरण आराखडा तयार करणार होते. मात्र महापालिकेने वर्सोवा-दहिसर, भाईंदर असा २२ किमी लांबीचा सागरी किनारा मार्ग बांधण्याचा निर्णय घेऊन यासाठीची कार्यवाही सुरू केली. पालिकेच्या या सागरी किनारा मार्गामुळे वर्सोवा-विरार सागरी सेतूची आवश्यकता उरलेली नाही. यामुळे एकाच परिसरात दोन प्रकल्प होणार असल्याने राज्य सरकारने वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्पात बदल करण्याची सूचना केली होती. त्यानुसार एमएमआरडीएने वर्सोवा-विरार सागरी मार्गाऐवजी उत्तन, भाईंदर-विरार असा सागरी सेतू बांधण्याचा निर्णय घेऊन यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला होता. मार्च २०२४ मध्ये राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली होती. मान्यता मिळाल्यानंतर एमएमआरडीएने उत्तन-विरार दरम्यान ५५ किमी लांबीच्या आणि २४ किमी लांबीच्या सागरी सेतूचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्याचे काम हाती घेतले होते. हे काम आता अंतिम टप्प्यात असल्याची माहिती एमएमआरडीएच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. आराखडा येत्या दहा दिवसांत पूर्ण होईल. त्यानंतर हा आराखडा मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठविण्यात येईल, असेही अधिकाऱ्याने सांगितले. उत्तन-विरार दरम्यान ५५ किमी आणि २४ किमी लांबीचा सागरी सेतू बांधण्यात येईल. भविष्यात या सागरी सेतूच्या टप्पा-२ अंतर्गत पालघरपर्यंत विस्तार होईल. एका आपत्कालीन मार्गिकेसह एकूण पाच मार्गिकेचा हा सेतू असेल. सेतूच्या एका बाजूची रुंदी अंदाजे १९.५ मीटर असेल. तर सागरी सेतू प्रकल्पातील जोडरस्ता आपत्कालीन मार्गिकेसह चार मार्गिकांचा असेल. जोडरस्त्याची एका बाजूची रुंदी १५.५ मीटर असणार आहे. या सागरी सेतूवर विरार, उत्तन आणि वसई असे तीन आंतरबदल मार्ग (कनेक्टर) असतील. त्यामुळे वाहनचालक - प्रवाशांना या तीन ठिकाणांहून सागरी सेतूवर ये-जा करता येणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास नरिमन पॉइंट ते विरार प्रवास अतिवेगवान होणार आहे. तर मिरा - भाईंदर, वसई - विरारमधील वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत होईल. तसेच मुंबई - अहमदाबाद मार्गावर पोहोचणेही सोपे होईल.

## वसईत अल्पवयीन मुलीवर सलग दोन दिवस बलात्कार, कंपनी मालकाविरोधात गुन्हा दाखल

**वसई/प्रतिनिधी**




वसईच्या सातिवली येथील कंपनीत काम करणाऱ्या १६ वर्षीय मुलीवर कंपनी मालकाने सलग दोन दिवस बलात्कार केल्याचे उघड झाले आहे. ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी रोजी कंपनीच्या कार्यालयात आणि गच्चीवर ही घटना घडली. याप्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. पीडित मुलगी १६ वर्षांची असून वसई पूर्वेच्या सातिवली येथील एका ऑफसेट प्रिंटीग कंपनीत काम करते. ३१ डिसेंबर रोजी कंपनीचा मालक प्रदीप प्रजापती (५०) याने पीडित मुलीला तिच्या विरोधात तक्रार आहे असे सांगितले. त्यावर तोडगा काढण्याचे कारण सांगून कार्यालयात बोलावले आणि दुपारी साडेतीनच्या सुमारास तिच्यावर कार्यालयात बलात्कार केला. या प्रकरणाने पीडित मुलगी प्रचंड घाबरली होती. तरी दुसऱ्या दिवशी म्हणजे १ जानेवारी रोजी ती कामावर आली. संध्याकाळी सर्व कर्मचारी घरी गेल्यावर प्रजापती याने तिला मोठ्या सेठना तुला भेटायचे आहे असे सांगून थांबवून ठेवले. त्यानंतर तिला कंपनीच्या गच्चीवर नेले आणि पुन्हा तिच्यावर बलात्कार केला. अखेर पीडित मुलीने वालीव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याबाबत वालीव पोलीस ठाण्यात आरोपी प्रदीप प्रजापती याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४, ६५(१) सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) च्या कलम ४, ८, १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पीडित मुलगी आमच्याकडे घटना घडल्यानंतर आली होती. मात्र कंपनी बंद होती. आरोपी निष्पन्न झाला असून लवकरच त्याला अटक केली जाईल, अशी माहिती वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप घुगे यांनी दिली.

## नायगाव पूर्वेकडील अध्यक्ष धरेंद्र कुलकर्णी यांचा बविआला रामराम

**वसई/प्रतिनिधी**



नायगाव पूर्वेकडील परेरा नगर कॉलनी आणि परिसरात बहुजन विकास आघाडी वाढविण्याचे काम करणारे आणि गेली २० वर्ष बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष असलेल्या धरेंद्र कुलकर्णी यांनी वर्षाच्या पहिल्याच दिवशी बहुजन विकास आघाडीला धक्का देत पक्षाचा आणि अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने खळबळ उडाली आहे. ग्रामपंचायतीच्या काळात ते कॉलनी विभागातून ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आले होते. बहुजन विकास आघाडीला नायगाव पूर्व कॉलनी भागात मोठा मतदार मिळवून देणारे तसेच या भागात गणेश चॅरीटेबल ट्रस्टच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी काम करणारे बहुजन विकास आघाडीचे गेल्या २० वर्षापासूनचे अध्यक्ष धरेंद्र कुलकर्णी यांनी काल अचानक पणे पंख सदस्य आणि अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने खळबळ उडाली आहे. धरेंद्र कुलकर्णी हे माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मर्जीतील युवा कार्यकर्ता असल्याची त्यांची ओळख असताना त्यांनी घेतलेला हा निर्णय म्हणजे बविआला मोठा धक्का मानला जात आहे.

## बदली झालेल्या ७ पोलीस अधिकाऱ्यांची पुन्हा नियुक्ती

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीच्या आचार संहिता काळात मीरा- भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयातील ३८ अधिकाऱ्यांच्या ३० ऑक्टोबर रोजी बदल्या केल्या होत्या. त्यात विविध पोलीस ठाण्यात कार्यरत असणार्या वरिष्ठ पोलीस अधिकार्यांना आयुक्तालय हे ठाणे आणि पालघर जिल्हा एकत्रीकरण असल्याने त्याचा फटका बसत बदल्या केल्या होत्या. त्यापैकी आता ७ पोलीस अधिकाऱ्यांची पुन्हा आयुक्तालयात नियुक्ती केली गेली आहे. तसे आदेश अपर पोलीस महासंचालक डॉ. सुखविंदर सिंह यांनी ३१ डिसेंबर रोजी निर्गमित केले आहेत. त्यानुसार त्यांना पुन्हा ज्या पोलीस ठाण्यात कार्यरत होते, तिथे त्यांना नियुक्ती दिली जाणार असल्याची चर्चा आहे. मीरा भाईंदर-वसई विरार आयुक्तालयातून मुंबईत बदली झालेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे, जितेंद्र वनकोटी, राजेंद्र कांबळे, चंद्रकांत सरोदे, विलास सुपे यांची आणि पोलीस निरीक्षक दिलीप राख, सुधीर गवळी या ७ पोलीस निरीक्षकांची पुन्हा बदली करून घर वापसी केली गेली आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालयात ३ वर्षां पेक्षा जास्त काळ कार्यरत अधिकार्यांच्या बदल्या करण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने ३१ जुलै आणि २८ सप्टेंबर २०२४ रोजी दिले होते. १५ ऑक्टोबरपासून आचार संहिता सुरु झाल्यानंतर २३ ऑक्टोबर रोजी मीरा- भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयाने बदलीस पात्र पोलीस अधिकार्यांची यादी मागवली होती. त्यात त्यांनी ती माहिती पोलीस महासंचालकांना सादर केली होती. त्यानंतर ३० ऑक्टोबर रोजी पोलीस आयुक्तालयातील ३८ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या गेल्या होत्या. २ नोव्हेंबर रोजी मुंबई व अन्य भागातील ३६ अधिकार्यांची नियुक्ती पोलीस आयुक्तालयात केली गेली होती. उपायुक्त मुख्यालय यांच्या आदेशात नव्याने हजर झालेल्या पोलीस अधिकार्यांपैकी तुळींज वगळता एकही पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक वा प्रभारी म्हणून नियुक्तीच केली गेली नव्हती, सदर अधिकार्यांच्या नियुक्त्या या तात्पुरत्या असल्याचे नमूद केले होते.

## आर्थिक पिळवणूक करणारी सावकारी टोळीतील एका महिलेसह पाच जणांविरोधात गुन्हे दाखल!

**वसई/प्रतिनिधी**

बेकायदेशीरपणे व्याजाने कर्जे देऊन आर्थिक पिळवणूक करणारी सावकारी टोळी वसईत कार्यरत असल्याचे उघड झाले आहे. माणिकपूर पोलिसांनी याप्रकरणी एका महिलेसह ५ जणांविरोधात सावकारी कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल केले आहे. ही टोळी प्रामुख्याने रिक्षाचालकांना कर्जे देऊन त्यांचे आर्थिक शोषण करत होती. वसई विरार मध्ये परराज्यातून मोठ्या संख्येने नागरिक स्थलांतरीत होऊन रहायला येतात. उपजिविकेसाठी ते रिक्षा चालवत असतात. त्यांना पैशांची गरज असते. अशा लोकांना बेकायदेशीरपणे व्याजाने कर्जे देऊन नंतर त्यांची आर्थिक शोषण करणारी एक टोळी वसईत कार्यरत होती. यातील एका प्रकरणात माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार झाल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. निलेश राठोड या रिक्षाचालकाने रेखा कनोजिया या महिलेकडून १ लाखांचे कर्ज घेतले होते. त्या बदल्यात मुद्दल संपेपर्यंत महिन्याला १० हजार आणि तीन कोरे धनादेश या सावकार महिलने घेतले होते. सुरवातीचे दोन महिने राठोड याने २० हजार रुपये कसेबसे फेडले. मात्र त्याला शक्य झाले नाही. त्यानंतर राठोडच्या आईने पदरमोड करून ८० हजार रुपये दिले. परंतु ही व्याजाची रक्कम असून मुद्दम बाकी आहे असे त्याला सांगण्यात आले. मुद्दलाचे ९० हजार रुपये दोन दिवसात भरण्याची धमकी देऊन त्याची रिक्षा जप्त करण्यात आली. याशिवाय कोऱ्या धनादेशावर ६ लाख रुपये टाकून वसूल करण्याची धमकी दिली. आधीच कर्ज, त्यावर वाढते व्याज आणि हातातील रिक्षा देखील गेल्याने राठोड हवालदील झाला होता. अखेर त्याने माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. माणिकपूर पोलिसांनी रेखा कनोजिया व तिची मुलं दर्पण कनोजिया, रोहित उर्फ चंदन कनोजिया, सागर कनोजिया यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम२०२३ कलम ३५१(२),३५२, सह महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ कलम ३९,४५,४६. नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यानंतर पोलिसांनी सावकारांनी जप्त केलेली रिक्षा तक्रारदारास परत मिळवून दिली. आरोपी हे वसईत बेकायदेशीरपणे व्याज देण्याचा व्यवसाय करत होते. अनेकांची त्यांनी आर्थिक फसवणूक केली आहे. आम्ही आरोपींविरोधात नोटीस बजावून गुन्हा दाखल केला आहे. या टोळीने कुणाला अशाप्रकारे व्याज देऊन फसवणूक केली असल्यास माणिकपूर पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक हरिश पाटील यांनी केले आहे.



हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे**, कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

06 TO 12 JANUARY 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 1/5/2025 6:01 PM Page 1



# वसई तालुका कला क्रीडा महोत्सवात रोहन म्हात्रे 'वसई श्री'



**वसई/प्रतिनिधी**

वसई तालुका कला क्रीडा मोहोत्सवाचे आकर्षण असलेली वसई श्री हि स्पर्धा काल रात्री नरवीर चिमाजी आप्पा मैदानावर पार पडली. या स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा रोहन म्हात्रे हा वसई श्री चा मानकरी ठरला आहे. या स्पर्ध्येत दिव्यांग्य स्पर्धकांनी हि वेगवेगळ्या पोज देऊन उपस्थितांची मने जिंकली. स्पर्ध्येसाठी तळकर जिमचे ९२ वर्षीय मधुकर तळवलकर उपस्थित होते. वसई तालुका कला क्रीडा मोहोत्सवाचे आकर्षण असलेली वसई श्री हि स्पर्धा काल संपन्न झाली. ६ गटात हि स्पर्धाघेण्यात अली होती. या स्पर्ध्येत काही काळ हा दिव्यांग स्पर्धकांना देण्यात आला होता. त्या वेळेत त्यांनी व्यायामाच्या वेगवेगळ्या पोज देऊन उपस्थितांना तोंडात बोटे घालायला लावली. या स्पर्ध्येसाठी शरीरसौष्ठव क्षेत्रातील ९२ वर्षीय महर्षी मधुकर तळवलकर, तीन वेळा मुंबई श्री, तीन वेळा महाराष्ट्र श्री, राष्ट्रीय विजेते, ळपींशीपरींळेपरश्र बॉडी बिल्डिंग जज ीरळपशी ष लहराळिप विकी गोरक्ष, महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे सरचिटणीस राजेंद्र चव्हाण, माजी आमदार क्षितिज ठाकूर, माजी महापौर प्रविण शेट्टी शरीरसौष्ठव स्पर्धेचे प्रायोजकगॉड लॉजिस्टिकचे अझिम शेख, मेन्स फिजिक स्पर्धेचे प्रायोजक वन फिटनेस जिमचे महेश आंबेकर,माजी विरोधी पक्ष नेते विनायक निकम,वसई पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पो निरिक्षक घाडीगांवकर शेषवंशी क्षत्रिय भंडारी समाजाचे नितीन ठाकूर, सुविधा स्टार केबलचे अनिल वर्तक व माजी नगराध्यक्ष सागर महांबरे उपस्थित होते. यावेळी बोलताना मधुकर तळवलकर यांनी सांगितले कि, इतक्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या या महोत्सवाचे कर्ते हितेंद्र ठाकूर आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन एक विलक्षण उर्जा देणारा असा हा सोहळा आहे. निरोगी आरोग्याचे रहस्य - रोज व्यायाम, नियंत्रित आहार आणि सर्वात महत्वाचे माझे सुंदर कुटुंब, आप्तस्वकीय नातेवाईक आणि आपणां सर्व मित्रपरिवाराचे भरपूर प्रेम. असल्यानेच मी या वयातही तंदुरुस्त आहे. असे सांगितले. यावेळी दिव्यांग शरीरसौष्ठव पटुंना माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत आणि अझिम शेख यांजकडून रोख पारितोषिके देण्यात आली.

# ट्रिपल शीट जाणं प्राणावर बेतलं; कार आणि दुचाकीच्या भीषण अपघातात तिघा मित्रांचा अंत






**डहाणू/प्रतिनिधी**

कार आणि दुचाकीच्या भीषण अपघातात तीन वीशीतल्या तरुणांचा दुर्दैवी मृत्यु झाल्याची घटना डहाणू तालुक्यात घडली आहे. दुचाकी आणि इको कारची समोरासमोर धडक झाल्याने भीषण असा अपघात कासा-सायवन मार्गावर घडला आहे. दुचाकीवरून ट्रिपल सीट जात असलेल्या तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. राहुल हरके (२०), चिन्मय चौरे (१९) आणि मुकेश वावरे (२०) अशी अपघातातील मृत तरुणांची नावे आहेत. डहाणू तालुक्यातील कासा- सायवन मार्गावरून राहुल हरके (२०), चिन्मय चौरे (१९) आणि मुकेश वावरे (२०) हे तीन तरुण एकाच दुचाकीवरून ट्रिपल सीट स्वार होऊन निघाले होते. त्यांच्या भरधाव दुचाकीने वाघाडी येथील गेल इंडिया कंपनीनजीक समोरून येणाऱ्या एका इको कारला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, इको कार जागीच उलटली. अपघातात दुचाकीचा देखील चक्काचूर झाला आहे. भीषण अपघात झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर स्थानिकांनी अपघातस्थळी मोठी गर्दी केली. तातडीने स्थानिकांनी अपघातग्रस्तांना कासा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तेथे त्यांना तपासून तरुणांना मृत झाल्याचे घोषित केले. दुचाकी आणि इको कारच्या या भीषण अपघातात राहुल हरके (वय २०), चिन्मय चौरे (वय १९) आणि मुकेश वावरे (वय २०) या तिघांच्या डोक्याला व पायांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातातील मृत तीनही तरुण डहाणू तालुक्यातील कासा चारोटी परिसरातील रहिवासी आहेत. अपघातात इको कार मधून प्रवास करणारी एक महिला जखमी झाली असून रीना मोरे असे जखमी महिलेचे नाव आहे. महिलेला उपचारासाठी कासा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच कासा पोलीस देखील घटनास्थळी दाखल झाले व घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला आहे. याप्रकरणी कासा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# कुडूस येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४वी जयंती उत्साहात साजरी



**वाडा/प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा वाडा तालुका शाखा, बोधीवृक्ष छाया मंडळ व रमाई महीला मंडळ यांच्या वतीने कुडुस येथील समाज गृह व वाडा येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात पालघर जिल्हा व तालुका पदाधीकारी तसेच विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महीला अतीथी यांच्या हस्ते आदर्शांच्या प्रतीमांना पुष्पहार अर्पन करुन, सुत्तपठण घेवुन आभिवादन करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित महीला अतीथी यांच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन प्रवासावर गीत गायनाच्या माध्यमातुन मनोगत व्यक्त करण्यात आले. वाडा येथील कार्यक्रमासाठी भारतीय बौध्द महासभा पालघर जिल्हा माजी संस्कार सचीव व वाडा तालुका कार्यालयीन सचीव नारायण जाधव गुरुजी, जिल्हा महिला संघटक, समता सैनिक मंदाताई कांबळे, तालुका संघटक वनिता ताई जाधव तसेच प्रमोदजी जाधव आदी उपस्थीत होते. तर कुडुस येथिल कार्यक्रमासाठी भारतीय बौध्द महासभा वाडा तालुका महीला संस्कार उपाध्यक्षा अपर्णा ताई गवळी, तालुका प्रचार- पर्यटन सचीव वैभवी ताई जाधव, महिला तालुका संरक्षण सचिव, समता सैनिक निशाताई वाघचौरे, आम्रपाली गमरे (राईरामा, चिंचघर), पोलीस पाटील कुडुस दर्शना जाधव, कुडुस ग्रामपंचायत सदस्य कादंबरी चौधरी, पडघा ग्रामपंचायत सदस्य रुपालीताई कथोरे, सामाजीक कार्यकर्त्या प्रतीक्षा पाटील, राजश्री तरसे, आयुनी. विनया पाटील व तालुका शाखेचे सदस्य तसेच ईतर महीला पदाधीकारी उपस्थित होत्या. आलेल्या सर्वांचे स्थानीक प्रतीनिधी यांच्या माध्यमातुन उपस्थित पदाधीकाऱ्यांचा यथोचित गुलाब-पुष्प देवुन स्वागत करण्यात आले.

# शहर गुन्हे शाखेकडून जबरी चोरी, मोटार सायकल चोरीसह ५ गुन्हे उघडकीस




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहर गुन्हे शाखेकडील पोसई मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथक यांना मिळालेल्या बातमीवरून त्यानी, कंबर तलाव ते जगदिश मंगल कार्यालय सोलापूर अशा जाणाऱ्या रोडवर, इसम नामे प्रदिप अशोक गुरव वय ३६ वर्षे, व्यवसाय मजुरी, राहणार रेवणसिध्देश्वर नगर, बसवेश्वर मठाच्या शेजारी, जुना विजापूर नाका झोपडपट्टी सोलापूर यास ताब्यात घेतले. त्यावेळी, नमूद इसमाचे पाठीवर असलेल्या बेंगवाचत त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता, त्याने, सदरची बॅग रेल्वे स्टेशन, सोलापूर समोरील रस्त्यावरून एका माणसाकडुन हिसका मारुन चोरले असल्याचे सांगितले. सदर बैंगेमध्ये नमूद आरोपीने जबरीने चोरलेली रक्कम रूपये ४५,२००/- मिळून आली. त्याबाचत, सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर गु.र.नं. ९३४/२०२४ भारतीय न्याय संहित्ता २०२३ चे कलम ३०९(४) अन्वयेचा दाखल गुन्हा उघडकीस आला आहे. तसेच नमूद इसम नामे प्रदिप गुरव यावे ताब्यातील विना नंबर प्लेट काळ्या रंगाच्या मोटार सायकल विचारपूस केली असता, त्याने सदर मोटार सायकलबाबत काहीएक उपयुक्त माहिती दिली नाही. सदर मोटार सायकलचे इंजीन व चेसि नंबर बाबत माहिती प्राप्त केली असता, सदरची मोटार सायकल १० वर्षापूवी सिव्हील हॉस्पीटल येथुन चोरी केली असल्याची माहिती दिली. त्यावरुन, सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर गुन्हा उघडकीस आला आहे. तसेच, पोसई/ मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथक असे, पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये ताना वाना चौक ते वल्याळ बगिचाकडे जाणाऱ्या सार्वजनिक रोडवर, सोलापूर या ठिकाणी गस्त करीत असताना, दोन इसम नामे- १) उदयकुमार रामलु कामुर्ती, २) आनंद श्रीरामलु नक्का, यांना विना नंबर प्लेट असलेल्या संशयीत मोटार सायकलसह चौकशीकामी ताब्यात घेतले. त्यांनतर, त्यांच्याकडे मोटार सायकल बाबत विचारपूस केली असता, त्यांनी त्यांचेकडील मोटार सायकल चोरी केली असल्याबाबत माहिती दिली. त्याबाबत जेलरोड पोलीस ठाणे, सोलापूर शहरमध्ये गुन्हे दाखल मोटार सायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे. त्याचप्रमाणे, पोसई मुकेश गायकवाड व त्याचे तपास पथक असे, पोलीस आयुक्तालय हद्दीत, विणकर बाग मध्ये मुस्लिम पाचम पेठ. सोलापूर या ठिकाणी गस्त करीत असताना, संशयीत इसम नामे रत्तन सोमनाथ माटे, वय २० वर्षे, व्यवसाय मजुरी, रा.मही वस्ती, बुध्द विहार, जुना तुळजापूर नाका, सोलापूर यास वाच्यात घेतल, त्यावेळी, त्याचे ताब्यातील मोबाईल बाबत विचारणा केली असता, सदरचा मोबाईल पोरीचा असले बाबत सांगितले. त्यानुसार, जेलरोड पोलीस जाणे, सोलापूर शहर गु.र.नं. ५५९/२०२४ मा.न्या.सं. २०२३ चे कलम ३०३ (२) अन्वये दाखल मोबाईल चोरीचा गुन्य उधडकीस आला आहे. त्याचप्रमाणे, पोसई मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथक यांना, गोपनिय माहिती प्राप्त झाली की, दोन इसम डोणगाव रोड येथील, मुस्लिम स्मशानभुमीच्या पुढे, जुन्या पत्र्याचे शेडच्या बाहेर थांबलेले असुन, त्या शेडमध्ये चोरीच्या टि.व्ही. ठेवल्या आहेत. त्या अनुषंगाने, नमुद ठिकाणी जावुन, दोन इसम नामे १) विनायक विठ्ठल गायकवाड, २) लखन अशोक गायकवाड यांना ताब्यात घेतले. त्यानंतर, त्यांचेसह सदर पत्र्याचे शेडची पाहणी केली असता, त्यामध्ये, चोरीचे ०७ डएऊ ढत ठेवलेले दिसुन आले. त्याबाबत, नमुद इसमांकडे अधिक चौकशी केली असता, त्या डएऊ ढत त्यांनी व त्यांचे आणखी दोन साथीदार नामे रोहित रमेश गायकवाड व राजकुमार उर्फ भोला आनंदया स्वामी यांनी मिळून, सुमारे दिड वर्षापूर्वी सोलापूर विद्यापित जवळ असलेल्या रोडवरील एका टेम्पोमधुन चोरले असल्याची माहिती दिली. त्यानुसार, फौजदार चावडी पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुरनं ७१६ -२०२४ भा.दं.वि. सं. कलम ३७९ अन्वये दाखल गुन्हा उघडकीस आला आहे. अशा प्रकारे, वरील नमुद ०६ आरोपीकडून, रोख रक्कम, ०२ मोटार सायकल, 07 LED TV, ०१. मोबाईल अरत एकूण ३.६९.२००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन, ०५ गुन्हे उघडकीस आले आहेत. सदरची कामगिरी सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस उपायुक्त गुन्हे शाखा डॉ. दीपाली काळे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा राजन माने, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली, पो.स.ई. मुकेश गायकवाड, पोलीस अंमलदार नंदराम गायकवाड, बाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, आनंद गडदुरे, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड यांनी केली आहे.

# आदिवासी बालिकेवर विनयभंग, गुन्हा दाखल

**पालघर/प्रतिनिधी**



पालघर शहरात एका आठ वर्षीय बालिकेवर लगतच्या ५४ वर्षीय किराणामाल दुकानदाराने विनयभंग केल्याचे प्रकार उघडकीस आले असून संबंधित व्यक्तीविरुद्ध बालकांचा लैंगिक अत्याचाराविरुद्ध कायदा (पॉक्सो) अंतर्गत पालघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुकानदार आपल्या पत्नीला व मुलांना गावी पाठवल्यानंतर किराणा माल घेण्यासाठी येणाऱ्या या बालिकेला गृह उपयोगी वस्तू विकत घेऊन जाण्यासाठी दुकानाच्या मधल्या बाजूला बोलवत असे. तसेच शरीराच्या लैंगिक भागांवर स्पर्श करण्याचा प्रयत्न त्यानी काही दिवसांपासून केला होता. या मुलीने याबाबतची माहिती आपल्या आईला सांगितल्या नंतर परिसरातील लोकांनी या व्यक्तीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. विशेष म्हणजे या दुकानदाराने यापूर्वी देखील असेच काही प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. या संदर्भात पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ही घटना घडल्या बाबत दुजोरा दिला. या बालिकेच्या लैंगिक अत्याचार विरोधी पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करत असल्याची माहिती त्यांनी दिली. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

# प्रारंभिक बाल शिक्षणाला नवा आयाम; महापालिकेकडून शहरातील ४१३ अंगणवाड्यांना 'जादुई पिटारा'चे वितरण

**विरार/प्रतिनिधी**



वसई-विरार महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी शहरातील ४१३ अंगणवाड्यांना लेसिंग बोर्ड, मासे पकडायचा खेळ, पेग बोर्ड, टच कार्ड्स, मोजणीचे मणी, आईस्क्रीमच्या रंगीत काड्या, प्राण्यांच्या कठपुतळ्या, कठपुतळी, बाहुली, कप्प्यांचा बोर्ड, ध्वनी पेटी, ४ तुकड्यांचे चित्रकोडे, कृती कार्ड, पटावरील खेळ, आकार किट, गोष्टीचे कार्ड, कवितेचे कार्ड, चित्र चर्चा कार्ड, रोल आणि कव्हर मॅट्स, मराठी अक्षरे, हुलाहूप, चेंडू, इमोशन बोर्ड, किट स्टोरेज बॉक्स अशी विविध प्रकारची शैक्षणिक खेळणी (जादुई पिटारा) वितरित करून एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. बालकांमध्ये सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि मूलभूत कौशल्ये विकसित करण्यासाठी हा संच तयार करण्यात आला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत, अंगणवाडी सेविकांना 'जादुई पिटारा' चा प्रभावी उपयोग कसा करावा, याचे प्रशिक्षण देण्यात आले. अंगणवाडी सेविकांना या प्रशिक्षणाद्वारे लहान मुलांसाठी शिक्षण अधिक आकर्षक व समृद्ध कसे बनवावे, याचे मार्गदर्शन करण्यात आले.

जादुई पिटारा चे वितरण हे वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रारंभिक बाल शिक्षण मजबूत करण्याच्या हेतूने एक महत्वाचा टप्पा आहे. जादुई पिटारा ही केवळ शैक्षणिक संसाधनांची पेटी नसून, ती या बालकांसाठी त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचे प्रवेशद्वार आहे. अंगणवाडी सेविकांना देण्यात आलेले प्रशिक्षण या संसाधनांचा उपयोग अधिक प्रभावीपणे करण्यासाठी उपयुक्त ठरेल. जादुई पिटारा मधील नविन्यपूर्ण संसाधनाच्या साहाय्याने मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर नक्कीच सकारात्मक परिणाम दिसून येईल. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या या जादुई पिटारा या उपक्रमामुळे अंगणवाडी प्रणाली अधिक सक्षम होईल आणि मुलांच्या प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणाचा पाया अधिक मजबूत होईल. या उपक्रमाच्या माध्यमातून शहरातील प्रारंभिक बाल शिक्षणामध्ये सकारात्मक परिवर्तन दिसून येईल, यात काय शंका नाही.

# तीन कारखान्यांना आगीची झळ

**बोईसर/प्रतिनिधी**

तारापूर औद्योगिक क्षेत्रातील एका रासायनिक कारखान्याला भीषण आग लागली. या आगीत रासायनिक कारखान्याचे मोठे नुकसान झाले असून आगीची झळ बाजूच्या इतर दोन कारखान्यांना लागली. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्ह्यातील आठ अग्निशमन दलांच्या जवानांचे प्रयत्न सुरू असून सुदैवाने या आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसल्याचे समोर आले आहे. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्रमांक के-६ वरील यु.के. अरोमॅटिक्स आणि केमिकल्स प्रा. लि. या सुगंधी द्रव्य बनविणाऱ्या कारखान्याला संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास प्रथम आग लागली. या कारखान्यात बनवण्यात येणारी उत्पादने व कच्चामाल हा ज्वलनशील असल्यामुळे आगीने क्षणार्धात रौद्ररूप धारण केले. आगीच्या तीव्रतेमुळे यु.के. रोमॅटिक्स कंपनीसह बाजूला असलेल्या श्री केमिकल्स आणि आदर्श टेक्सटाईल्स या आणखी दोन कंपन्या देखील आगीच्या भक्षस्थानी सापडल्या. आग लागताच यु.के.रोमॅटिक्स तसेच बाजूच्या सर्व कंपन्यांमधील कामगारांना तातडीने बाहेर काढण्यात आल्याने कोणतीही. जिवीतहानी झाली नाही. मात्र कारखान्यांना आगीची झळ पोचून मोठे नुकसान झाले आहे. आगीची खबर मिळताच तारापूर अग्निशमन, वसई विरार महानगरपालिका, पालघर नगर परिषद, अदानी पावर, तारापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या एकूण आठ बंबांसह अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले असून ज्वलनशील पदार्थांमुळे आग नियंत्रणात आणण्यास अडथळे येत आहेत. पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार रमेश शेंडगे यांनी पाहणी केली.

# श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेत यश

**लातूर/प्रतिनिधी**

अभिनव मानव विकास संस्था द्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. या परीक्षेला विद्यालयातील एकूण ५५ विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये ३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी ९ विद्यार्थी दुसऱ्या स्तरावरील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेस विद्यालयातील सहावीच्या वर्गातील २३ तर इयत्ता नववीचे ३२ विद्यार्थी बसले होते. त्यात सहावीचे ११ तर नववीचे २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर सहावीमधील विद्यार्थी माऊली महेश जगळपुरे आणि इयत्ता ९वीचे अथर्व संतोष मरे, अथर्व राजाराम कात्रे, आदित्य अभिजित हेबारे, यशराज सचिन बिरादार, प्रणव मिलिंद अंचुले, समर्थ कल्याण गिरवलकर, अलोक विठ्ठल पिनाटे व प्रज्वल ईश्वरप्रसाद अजमेरा हे ८ असे एकूण ९ विद्यार्थी दुसऱ्या स्तरावरील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना सुरेखा भोसले, मधुकर काळे यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ.चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समिती अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी अभिनंदन केले आहे.

# अवकाळी पावसाने मोखाड्यातील नागली पिकांचे मोठे नुकसान

**मोखाडा/प्रतिनिधी**



२७ डिसेंबर रोजी रात्री बारा वाजेच्या दरम्यान अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने बेसावध शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. यात नागलीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला गेला आहे. मोखाडा तालुक्यात ३ हजार ८०० हेक्टर क्षेत्रावर नागलीचे पीक घेतले जाते. नागली हे पीक जव्हार, मोखाडा तालुक्यातील मुख्य पीक आहे. या पिकाचा उपयोग येथील शेतकरी हे उपजीविकेसाठी करीत असतात. त्यामुळे या पिकाला विशेष मान आहे. नागली अर्थात कणसरी देवीची यथावत पूजा करून, रास भरून, नैवद्य दाखवून मगच हे पीक घरी आणले जाते. मोखाडा तालुक्यात कंपनी करून नागलीचे पीक खळ्यावर साठवले जाते व एप्रिल अखेरीस किंवा मे महिन्यात नागलीचे पीक मळले जाते . तसेच घरी आणून कणग्यांमध्ये साठवून ठेवले जाते. पुढे वर्षभर आवश्यकतेनुसार उपजीविकेसाठी उपयोग केला जातो. परंतु अवकाळीने या उपजीविकेच्या पिकाचीच प्रचंड नासधूस केल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावून घेतला आहे. नागली आणि भात ही दोन प्रमुख पिके असून त्यांचा उपयोग प्राधान्याने उपजीविकेसाठी केला जातो. या अगोदर अशाच प्रकारे प्रचंड प्रमाणात पाऊस झाल्याने शेतात वाळत घातलेल्या भात पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले होते आता नागलीला ही पावसाने ओलेचिंब केल्याने शेतकऱ्यांची उरली सुरली आशाही संपुष्टात आली आहे. त्यामुळे आता खायचे काय? हा यक्ष प्रश्न शेतकर्यांना भेडसावणारा आहे.

06 TO 12 JANUARY 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 1/5/2025 6:02 PM Page 1



पान १ वरून....

## सुरक्षा रक्षकाचा खुन करून डॉक्टर...

प्रेमीला उर्फ प्रेमा ही माझ्या लेकराचा डॉक्टर आणि त्याच्या साथीदारांनी खून केला असा आरोप करून धायमोकलून रडत होती. दरम्यान १२ डिसेंबर रोजी दहा वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल शिरसाठ यांनी दवाखान्याला भेट देऊन शिवाजीनगर पोलीस ठाण्याला प्राप्त झालेल्या एमएलसीनुसार मयताची अधिक माहिती घेऊन प्रेत उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय दवाखान्यात पाठवण्याची तजबीज केली. मयताची आई प्रमिला उर्फ प्रेमा भरत डोंगरे (५५) यांच्या फि र्यादीवरून शिवाजी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुरनं ४८९/२४ कलम १०३,(१) ३,(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरा, लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजित सावंत यांचा मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्रे शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांच्या हाती देण्यात आले. तपासाचे चक्र गतिमान करत शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांनी या प्रकरणातील प्राथमिक माहिती घेण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम पोलिसाचे एक पथक रेनापुर नाका येथे असलेल्या आयकॉन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. तेव्हा तेथे हॉसपिटलच्या दैनंदिनीच्या एका नोटीस बोर्डवर कॉन्फरन्स मीटिंग साठी डॉक्टर प्रमोद घुगे हे तीन-चार दिवसासाठी बाहेरगावी गेले आसल्याने रूग्ण तपासणी बंद आसल्याचे नमुद करण्यात आले होते. पोलिसांनी हॉस्पिटल मधील इतर डॉक्टर आणी कर्मचाऱ्यांची भेट घेवून अधिक माहीती जाणुन घेतली. तसेच तेथील सुरक्षा रक्षकांना विश्वासत घेवून अधिक माहीती जाणून घेतली. दरम्यान ११ डिसेंबर २०२४ रोजी बाळू डोंगरे आयकॉन हॉस्पिटल येथे रात्री १० वाजण्याच्या सुमारास आला आणी लगेच परत गेला. त्यांनतर तो परत आपल्या स्कुटीवरून अर्ध्या तासांनी हॉस्पिटलच्या दिशेने आला आसल्याची खात्रीशीर माहीती पोलिसांनी हास्तगत केली. बाळु डोंगरेचा अपघात नसून त्याचा घात झाल्याचा आरोप नातेवाइकांनी केल्याने त्यानुसार शिवाजीनगर पोलिसांनी प्राथमिक तपास सुरू केला असता बाळूचा मृत्यू हा मारहाणीत झाल्याचे स्पष्ट झाले. पगारीच्या पैशाची मागणी केल्याने संशयीत आरोपी डॉक्टर प्रमोद घुगे व त्यांचा भाचा अनिकेत मुंडे यांनी त्यास जबर मारहाण करून खून केल्याची प्राथमिक माहीती समोर आली. दरम्यान बाळू डोंगरे यांचा अपघात झाला आणि त्याच्यावर उपचार करताना तो मृत झाला असा बनाव तयार करण्यासाठी डॉक्टर घुगे व त्यांचा भाचा अनिकेत मुंडे यांनी बाळू डोंगरे वापरत असलेली स्कूटी रस्त्याच्या बाजूला नेऊन त्याची मोडतोड केली. तसेच स्कुटीच्या नंबर प्लेटची तोडफोड केली आसल्याची खात्रीलायक माहीती पोलिसांनी हास्तगत केली.पोलिसांनी या प्रकरणातील अधिक माहीती घेण्यासाठी बाळू डोंगरे राहत आसलेल्या इंडीया नगर भागाकडे आपला मोर्चा वळविला. बाळू डोगरे यांच्या नातेवाईकांची भेट घेवून अधिक माहीती जाणून घेतली असता. लातूर शहरातील इंडिया नगर भागात बाळु डोंगरे आई-वडील, बायको, दोन मुलं, यांच्यासह एकत्र राहत होता. त्याचे आई वडील वारकरी संप्रदायातले असल्याने बाळू डोंगरे यांच्यावर चांगले संस्कार झाले होते. शालेय शिक्षण घेतलेला बाळू डोंगरे आपल्या कुटुंबाचा उदारनिर्वाह चालवण्यासाठी हाताला लागेल ते कामे करत होता. शरीराने धष्टपुष्ट आणि दिसायला रुबाबदार असलेल्या बाळू डोंगरे याला सुरुवातीपासूनच आणि सिक्युरिटी गार्ड या पदाचे कामे मिळाली. गेल्या काही महिन्यापूर्वीच लातूर शहरातील अंबाजोगाई रोड भागात असलेल्या बस स्थानक क्रमांक दोन च्या बाजूला डॉक्टर प्रमोद प्रभू घुगे यांचे नवीन आयकॉन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा शुभारंभ झाला होता. एका ओळखीच्या डॉक्टरच्या मध्यस्थीने बाळू भरत डोंगरे यांने आयकॉन सुपर स्पेशलिस्ट हॉस्पिटलमध्ये सुरक्षा गार्डची नोकरी मिळवली होती. जुना रेनापुर नाका हा बाळू डोंगरे यांच्या परिचयाचा भाग होता. त्यामुळे त्या भागात त्याची चांगलीच ओळख आणी दहशत होती. नवीन आणी सर्व सोईने सज्ज आसलेल्या आयकॉन हॉस्पिटलला येणाऱ्या रुग्णांची खुपच होती. रूग्णांची संख्या पाहता आणि तेथील कामकाज पाहता बाळू डोंगरे हा नेहमीच त्या कामांमध्ये सातत्य दाखवत होता. येणाऱ्या रुग्णांनाजवळ तत्पर हजर राहून त्यांना सविस्तर माहिती देऊन मदत करणे असा त्याचा नित्यक्रम होता. त्याचे हे काम पाहून डॉक्टर प्रमोद घुगे देखील प्रभावित झाले होते. यातूनच डॉक्टर प्रमोद घुगे आणि बाळू भरत डोंगरे यांच्यात चांगलाच सुसंवाद सुरू झाला होता. बाळू डोंगरे यांनी डॉक्टर प्रमोद घुगे यांचा विश्वास संपादन केला. बाळु डोंगरे आणी डॉ. प्रमोद घुगे यांचे नांते दोस्तान्यात बदलले होते. डॉ. प्रमोद घुगे यांचे बहूतेक खाजगी आणी महत्वाचे कामे बाळू डोंगरे पहात होता. दरम्यान सहा महीन्यापुर्वी आयकॉन सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे अचानक लिफ्ट बंद पडले होते. हॉस्पिटलच्या लिफ्टचे काम ज्या कंपनीने केले होते त्यांना कळवूनही त्या कंपनीचे कर्मचारी लिफ्ट दुरूस्तीसाठी वेळ लावत होती. वारंवार लिफ्टमध्ये आडथळा येत आसल्याने डॉ. प्रमोद घुगे चिडले होते. डॉ. प्रमोद घुगे व लिफ्ट दुरूस्ती करणाऱ्या ठेकेदारामध्ये बऱ्याचदा शाब्दीक चकमक उडाली होती. दरम्यान लिफ्ट दुरुस्ती करण्यासाठी आलेल्या कर्मचाऱ्यांचे अपहरण करून डॉ. प्रमोद घुगे यांनी त्या कर्मचाऱ्याला स्वतःच्या फार्म हाऊस मध्ये डांबून ठेवत अमानुष मारहाण केली होती. काही दिवसांनी लिफ्ट कर्मचाऱ्यांनी आपली कशीबसी सुटका करून घेत लातूर एमआयडीसी पोलिस ठाण्यात अॅट्रासिटीचा गुन्हा दाखल केली होती. यामूळे डॉ. प्रमोद घुगे वादाच्या भोवऱ्यात आडकले होते. मात्र हे सारे प्रकरण बाळू डोंगरे यांनी आपण केल्याचे सांगून या प्रकरणाची केस आपल्यावर ओढून घेतली होती. त्यांनंतर दोन तिन महीन्यात डॉ. प्रमोद घुगे यांनी बाळू डोंगरे याला नोकरीवरून काढून टाकेले होते. एवढी माहीती पोलिसांच्या हाती आली. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांनी बाळू डोंगरे मृत्यू प्रकरणातील संपूर्ण माहिति एकत्र करून अभ्यास करण्यास सुरुवात केली. दरम्यानच्या काळात शिवाजीनगर पोलीस ठाण्याला बाळू डोंगरे याच्या मृत्यूचा वैद्यकीय अहवाल प्राप्त झाला.या वैद्यकीय अहवालावरून बाळू डोंगरे याचा खून झाल्याचे निषपन्न झाले. त्याच्या डोक्यात जाड वस्तुने मारहाण करण्यात आली होती. तसेच त्याच्या शरीराच्या विविध भागावर लाकूड आणि लोखंडी रोडच्या साह्याने मारल्याने त्याचे हाडे ठीक ठिकाणी फ्रॅक्चर झाले होते. यावरून बाळू डोंगरे खून प्रकरणात एक पेक्षा अधिक लोकांचा समावेश असल्याचा प्राथमिक अंदाज शिवाजीनगर पोलीसा कडून वर्तविण्यात येत होता. बाळू डोंगरे यांचा मृत्यूनंतर ऑयकांन हॉस्पिटलचे डॉक्टर प्रमोद घुगे कॉन्फरन्स मीटिंग चे कारण दाखवत गायब झाल्याने त्यांच्या भोवती संशयाची सुई फिरत होती. घटनेला पाच-सहा दिवस उलटूनही या खून प्रकरणातील डॉक्टर प्रमोद घुगे पोलिसांना मिळून येत नव्हता त्याच्यामुळे पोलिसांच्या तपासावर संशय व्यक्त करण्यात येत होता. या खून प्रकरणातील संशयित आरोपीचा शोध घेण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सर्वच पोलीस ठाण्यांना समांतर तपासाचे आदेश दिले होते. बाळू डोंगरे खून प्रकरणातील संशयित आरोपीचा माग काढण्यासाठी पोलिसांनी काही खास खबऱ्यांची नियुक्ती केली होती. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा देखील आधार घेतला होता. दिवसा मागून दिवस उलटत होते तरी या खून प्रकरणातील संशयित आरोपीचा माग निघत नव्हता. पोलिसांनी डॉक्टर प्रमोद घुगे यांच्या नातेवाईकाकडे बरीच चौकशी केली होती. तसेच त्यांच्या नातेवाईकांच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवून होते. आरोपीचा मग काढण्यासाठी शिवाजीनगर पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक तयार करण्यात आले होते. संशयित आरोपीचा मार्ग काढण्यासाठी धडपडत असलेल्या पोलिसांना अखेर एक आशेचा किरण दिसला. डॉक्टर प्रमोद घुगे यांच्या पत्नीच्या मोबाईलवर उत्तराखंड राज्यातील हरिद्वार येथील एका आश्रमाचा एसएमएस आला. त्या एसएमएस मध्ये आपला प्रवेश निश्चित झाल्याचे नमूद करण्यात आले होते. या तांत्रिक माहितीच्या आधारे शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक हरिद्वारच्या दिशेने रवाना झाले. या पथकात पोहे . युवराज गिरी, खुरम काजी, एपीआय चव्हाण, पीएस आय कवले, पाहेकॉ. बोचरे यांचा समावेश करण्यात आला होता. पोलिसांचे हे पथक हरिद्वार येथे दाखल होताच या पोलीस पथकांनी आपल्या कौशल्यातून हरिद्वार येथील पतंजलीचे आश्रम शोधून काढले. त्या आश्रमावर पाळत ठेवली असता डोक्यावरील केस कापून अंगात पांढरे वस्त्र परिधान करून वेषांतर करत डॉक्टर प्रमोद घुगे तेथे वास्तव्य करत असल्याचे आढळून आले. तेथील पोलिसाच्या मदतीने लातूरच्या पोलीस पथकाने त्याच्यावर छापा मारून त्यांच्या मुस्क्या आवळल्या. दरम्यान डॉक्टर प्रमोद घुगे यांनी लातूर सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनी साठी अर्ज केला होता. अगोदरच पोलिसांनी त्याच्या मुस्क्या आवळल्या. शिवाजीनगर पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकांनी बाळू डोंगरे खून प्रकरणातील पहिला संशयीत आरोपी ताब्यात घेत लातूरमध्ये हजर केले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सुरुवातीला समाधानकारक उत्तरे दिली. डॉक्टर प्रमोद घुगे मला विश्वासात घेत अधिक चौकशी केली असता त्यांनी सांगण्यास सुरुवात केली. डॉक्टर प्रमोद प्रभू घुगे हे तुळजापूर पासून जवळच असलेल्या अणंदुरा गावचे रहिवासी. घरची परिस्थिती बेताची असताना अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करत डॉक्टर प्रमोद घुगे यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले होते. सुरुवातीपासूनच वैद्यकीय शिक्षणात हुशार असलेल्या प्रमोद घुगे यांनी वैद्यकीय क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी काम करताना आपल्या कामाचा ठसा उमटवला होता. गेल्यावर्षी त्यांनी लातूर शहरातील जुना रेनापुर नाका परिसरात आयकॉन सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल चा शुभारंभ केला होता. या हॉस्पिटलच्या उद्घाटनाला राजकारणातील बऱ्याच मोठ्या पुढाऱ्यांनी हजेरी लावली होती. त्यांचा या हॉस्पिटलमध्ये त्यांच्याच जुन्या परिचयाचा जयराम देवीदास कांबळे हा मेडिकलचे दुकान टाकून व्यवसाय करत होता. तर बाळू भरत डोंगरे हा याच हॉस्पिटलमध्ये सिक्युरिटी गार्डचे काम पहात होता. बाळू डोंगरे यांनी आपल्या कामाची चुणूक दाखवत अगोदरच डॉक्टर प्रमोद घुगे यांचा विश्वास संपादन केला होता. बाळू डोंगरे सिक्युरिटी गार्डच्या सुट्टीनंतर बराच काळ हॉस्पिटलमध्ये घालवत होता. दवाखाना प्रशासनात बाळू डोंगरेचा हस्तक्षेप वाढला होता. ही गोष्ट मेडिकल चालक जयराम देविदास काळे याला आवडत नव्हती. हॉस्पिटलचा सर्व स्टाफ माझ्याशी चांगलं बोलतो मात्र मेडिकल चालक माझ्याशी चांगलं बोलत नाही याचा अंदाज बाळू डोंगरी आला होता. दरम्यान लिफ्ट दुरुस्ती करण्यासाठी आलेल्या कर्मचाऱ्यांचे अपहरण करून डॉ. प्रमोद घुगे यांनी त्या कर्मचाऱ्याला स्वतःच्या फार्म हाऊस मध्ये डांबून ठेवत अमानुष मारहाण केली होती. या प्रकरणी लातूर एमआयडीसी पोलिस ठाण्यात अॅट्रासिटीचा गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणानंतर बाळु डोंगरे आणी डॉ. प्रमोद घुगे यांच्यात काहीसे तणावाचे वातवरण तयार झाले होत. त्यातुनच डॉ. प्रमोद घुगे यांनी बाळु डोंगरे याला नोकरीवरून काढून टाकले होते. तरीपण बाळू डोंगरे हॉस्पिटलला सारखाच येत होता. ११ डिसेंबर २०२४ रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास डॉक्टर प्रमोद प्रभू घुगे मेडिकल दुकान चालक जयराम कांबळे हे हॉस्पिटलच्या टेरेसवर गप्पा मारत मारत मद्य प्राशन करत होते. त्यावेळी बाळू डोंगरे तेथे आला. बाळू डोंगरे त्यावेळी मद्य धुंद अवस्थेत होता. तेव्हा तेथे जयराम कांबळे आणि बाळू डोंगरे यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. बाळू डोंगरे याने जयराम कांबळे याला अश्लील शिवीगाळ करत त्याची माय बहीण उधळली. हा सारा प्रकार डॉक्टर प्रमोद घुगे डोळ्यांनी पहात होते. डॉक्टर प्रमोद घुगे यांनी जयराम कांबळे आणि बाळू डोंगरे यांच्या भांडणात हस्तक्षेप करत बाळू डोंगरे याला शांत बसण्यास सांगितले. मात्र बाळू डोंगरे ऐकण्यास काही तयार नव्हता. बाळू डोंगरे आणि जयराम कांबळे यांचा वाद आणखीन वाढत गेला. बाळू डोंगरे यांनी जयराम कांबळे यांच्या पत्नी विषयी अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली त्यावेळेस डॉक्टर प्रमोद घुगे यांचा राग अनावर झाला आणि त्यांनी मद्याची बाटली हातात घेऊन बाळू डोंगरे यांच्या डोक्यात मारली. बाटलीचा मार डोक्यात लागल्याने बाळू डोंगरे जमिनीवर कोसळला. राग अनावर झालेल्या जयराम कांबळे आणि प्रमोद घुगे यांनी परत बाळू डोंगरे याला काठीने मारहाण करण्यास सुरुवात केली. बाळू डोंगरे निचपत पडल्याचे पाहून भानावर आलेल्या डॉक्टर प्रमोद घुगे आणि जयराम कांबळे यांनी डॉक्टर प्रमोद घुगे यांचा भाचा अनिकेत मुंडे याला टेरेसवर बोलवून स्ट्रेचर घेऊन येण्यास सांगितले. दरम्यान या तिघांनी स्ट्रेचर घेऊन बाळू डोंगरे याला स्ट्रेचर वर टाकत हॉस्पिटलमध्ये दाखल केले. बाळू डोंगरे यांची प्रकृती चिंताजनक बनल्याने डॉक्टर प्रमोद घुगे आणि अनिकेत मुंडे यांनी बाळूचा अपघात झाल्याचा बनावा करण्यासाठी बाळू डोंगरे वापरात असलेल्या स्कुटीची मोडतोड केली. दुसऱ्या दिवशी म्हणजे १२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास बाळू डोंगरे यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याचे लक्षात आल्याने घाबरलेल्या डॉक्टर प्रमोद घुगे यांनी तेथून पळ काढला. आपल्या खाजगी वाहनातून ड्रायव्हरला सोबत घेत पुणे गाठले. पुण्यामध्ये स्वतः एकटे थांबून गाडी परत लातूरला पाठवली. डॉक्टर प्रमोद घुगे यांनी आपण वापरत असलेले मोबाईल बंद केले. पुणे रेल्वे स्थानकावरून उत्तराखंडच्या दिशेने हरिद्वार येथे पलयान केले. हरिद्वार येथील पतंजली आश्रमात प्रवेश घेताना आपले नाव वेगळे सांगून तेथे प्रवेश मिळवला. आश्रमात प्रवेश मिळवताना त्यांनी आपल्या पत्नीचा मोबाईल क्रमांक आश्रमामध्ये नमूद केला. आणि आश्रम प्रशासनाने पाठवलेला हा एसएमएस डॉक्टर प्रमोद घुगे चा शोध घेण्यासाठी महत्त्वाचा दुवा ठरला. डॉक्टर प्रमोद घुगे यांनी नोंदविलेल्या जबाबावरून पोलिसांनी या खून प्रकरणातील अन्य दोन आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. या प्रकरणातील दुसरा सशयीत आरोपी अनिकेत मुंडे याला लातूर शहरातून अटक केली. तर या प्रकरणातील तिसरा आरोपी जयराम कांबळे याला लातुर शहरातील राजीव गांधी चौकातून अटक केली. या दोघांनाही न्यायालयात हजर केली असता त्यांना पोलीस कोठडी देण्याचे देण्यात आली. पोलिसांनी या खून प्रकरणात आरोपीने वापरलेले हत्यार, रक्ताने माखलेले कपडे तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन जप्त करण्याच्या दृष्टीने तपास सुरू केला आहे. ही कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचा मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर, ए पी आय चव्हाण, पीएसआय कवले, पोहे बोचरे, धैर्यशील मुळे, खुर्रम काजी, युवराज गिरी यांनी मोलाची कामगिरी केली.

## पालकांचा उपदेश ऐकून मुलगा भयंकर...

करतात. तर अरुणा विनोबा भावे नगर येथील एका खाजगी शाळेत प्राथमिक शिक्षिका होत्या. आरोपी उत्कर्ष हा ६ वर्षापासून अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होता. वारंवार अपयश आल्याने उत्कर्षच्या पालकांनी अभ्यास सोडून शेती करण्याचा सल्ला देत होते. पण उत्कर्ष अभियांत्रिकी पूर्ण करण्याच्या त्याच्या आग्रहावर ठाम होता. मात्र आरोपी उत्कर्षला एमडीचे व्यसन होते आणि या व्यसनामुळे त्याला अभ्यास करता येत नव्हता.

आई-वडिलांच्या सततच्या समजुतीमुळे तो चिडला आणि रागाच्या भरात त्याने आपल्या आई-वडिलांची हत्या करण्याचा घातक प्लॅन तयार केला. पुढे आलेल्या माहितीनुसार, उत्कर्षने फ्लॅन नुसार २६ डिसेंबरला सकाळी आपल्या धाकटी बहीण सेजल हिला कॉलेजला सोडले होते. सेजल बीएमएसचे शिक्षण घेत होती आणि ती वर्धा रोडवर असलेल्या कॉलेजमध्ये जाते. उत्कर्षने बहिणीला कॉलेजला सोडल्यानंतर खासाळ येथील आपल्या घरी पोहोचला, तिथे १ वाजताच्या सुमारास त्याने आधी आई अरुणाचा गळा आवळून खून केला. त्यानंतर आरोपी वडिलांची घरी येण्याची वाट पाहू लागला. ५ वाजताच्या सुमारास वडील त्यांच्या ड्युटीवरून घरी पोहोचल्यानंतर वडिलांवर धारदार शस्त्राने वार करून हत्या केली. दोन्ही हत्या केल्यानंतर आरोपीने घराला कुलूप लावून वडिलांची गाडी आणि मोबाईल फोन कोराडी येथे राहणाऱ्या मामाकडे नेला आणि तेथून आपल्या बहिणीला फोन करून सांगितले की तो काही दिवसांसाठी ध्यान करायला बंगलोरला जात आहे व बहिणीला काकाकडे सोडून दिले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्कर्ष मंगळवारी रात्री त्यांच्या घरी आला आणि त्याने जोरात दरवाजा ठोठावण्याचा बहाणा केला. त्यानंतर बुधवारी सकाळी ते पुन्हा कोराडीला काकांकडे झोपायला गेले असता, शेजाऱ्यांना उग्र वास येऊ लागल्याने त्यांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी दरवाजा तोडून आत तपासले असता घरभर रक्ताने माखलेले अरुणा व लीलाधर यांचे मृतदेह अखंड अवस्थेत आढळून आले. प्राथमिक तपासादरम्यानच खून झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती, त्यामुळे पोलिसांनी उत्कर्षला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता, त्याने आपल्या आई-वडिलांची हत्या केल्याची कबुली दिली. पोलिसांनी उत्कर्षला अटक केली असून पोलीस घटनेचा पुढील अधिक तपास आहे.

## तिसरी मुलगी होताच पतीचे डोके ...

मुलीच्या संगोपनाची जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे, अशी मागणी भाग्यश्री काळे यांनी सांगितले. घटनेबाबत बोलताना पोलीस निरीक्षक ननवरे यांनी सांगितले की, आरोपीला अटक करून तीन दिवसांची पोलीस कोठडी घेतली आहे. या घटनेनंतर परिसरातील सीसीटीव्ही पोलिसांनी पाहिले आहेत. पुरावे जमा केले आहेत. आरोपीस कडक शिक्षा होईल त्या अनुषंगाने तपास करत आहोत. दरम्यान पीडित कुटुंबियांची आमदार राहुल पाटील भेट घेतली. तसेच त्यांनी साधला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संवाद साधला. ते म्हणाले, महिलेला जळण्याचे दुर्दैवी काम नराधमाने केले आहे. मुलगी झाल्यानंतर दुय्यम वागणूक मिळायला नको आहे. या दुर्दैवी घटनेत मी मुख्यमंत्र्यांना बोललो आहे. पंचनामाचा रिपोर्ट तयार केला आहे. शासनाकडून ५० लाखांची मदत त्या लहान तीन मुलींना करावी, अशी मागणी केली आहे.

## पार्टीत मित्रांना आग्रह करून फसला...

सीसीटीव्ही फुटेज चेक करण्यास सुरुवात करण्यात आली होती. कामोठे पोलीस आणि कळंबोली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अमोल चौगुले यांनी चौकशी केली असता संज्योत मंगेश दोडके (वय १९), शुभम महेंद्र नारायणी (वय १९) या कामोठे येथील तरूणांची माहिती मिळाली. त्यांना पोलिसांनी उलवे परिसरातून ताब्यात घेतले. संज्योत मंगेश दोडके, शुभम महेंद्र नारायणी हे दोघेही मृत जितेंद्र जग्गी (वय ४५) याच्या परिचयाचे होते. मृत जितेंद्र याने दोघांनाही ३१ डिसेंबरला त्याच्या घरी पार्टी करण्यासाठी बोलावले होते. तिघांनी प्रचंड दारू प्यायली. दारू प्यायल्यानंतर मृत जितेंद्र हा संज्योत आणि शुभम यांना समलैगिंक सबंध ठेवण्यासाठी आग्रह करू लागला. याचा प्रचंड राग आल्याने शुभम नारायणी याने एक्सटेंशन बोर्ड जितेंद्र जग्गी याच्या डोक्यात मारून त्याला ठार मारले. तर संज्योत याने मृत गीता जग्गी यांचा गळा आवळला. त्यानंतर आरोपींनी घरातील किंमती सामान चोरून नेले. अखेर पोलिसांनी या दोघांनाही ताब्यात घेऊन अटक केली आहे.

क्राईम Reporter
क्राईम संध्या साप्ताहिक आता लवकरच
पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर
प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या
शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.
9890718873

पान ८ वरून....

## ज्येष्ठ नागरिक समाजाचा महत्वाचा...

स्थापना दिवस अर्थातच रेझिंग डे सप्ताह सध्या सुरू असून या निमित्ताने विविध सेवाभावी उपक्रम पोलीस प्रशासना कडून राबवले जात आहे असे प्रास्ताविकात पोलिस उपायुक्त डॉ मोहन दहीकर यांनी स्पष्ट केले तर सायबर क्राईम ऑनलाईन फसवणूक वाढली आहे. तोतया पोलिस यांच्या कडून होणाऱ्या फसवणूक टाळण्यासाठी बाळगायची सावधगिरी या बाबत पोलिस निरीक्षक अतुल अडूरकर यांनी माहिती दिली. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक देशमुख यांनी केले. तर या नंतर सर्व उपस्थित जेष्ठ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

## कामाच्या ठिकाणी महिलांकरिता सुरक्षित...

अधिकारी डॉ. भारत कदम, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जावेद शेख यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. काही वेळा महिलांना कामाच्या ठिकाणी त्रासाला सामोरे जावे लागते, त्यांचा लैंगिक छळ होतो. मात्र त्या तक्रार करायला धजावत नाहीत. महिलांसाठी प्रत्येक कार्यालयात सुरक्षित वातावरण निर्माण होण्यासाठी, तसेच त्यांच्यामध्ये आत्मविश्र्वास निर्माण करण्यासाठी कार्यालय प्रमुख, कार्यालयातील सहकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे श्रीमती रहाटकर म्हणाल्या. महिलांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी अंतर्गत तक्रार निवारण समित्यांची दर तीन महिन्यांनी आढावा बैठक घ्यावी. या समितीचे सदस्य म्हणून काम करणाऱ्या प्रत्येकाने समितीला मिळालेल्या अधिकाराचा वापर करून महिलांना न्याय द्यावा. तसेच महिलांवर तक्रार करण्याची वेळ येणार नाही, असे वातावरण कार्यालयात निर्माण करावे, असे त्या म्हणाल्या. यासोबतच असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांसाठी गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार निवारण समितीबाबत जनजागृती करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. दरम्यान लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात तयार करण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे, तसेच पोलीस दलामार्फत शहरातील रिक्षांमध्ये लावण्यात आलेल्या 'डायल ११२' विषयक क्यूआर कोड उपक्रमाचे श्रीमती रहाटकर यांनी कौतुक केले. तसेच हे दोन्ही उपक्रम देशात सर्वत्र राबविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे श्रीमती विजया रहाटकर यांनी सांगितले. तसेच लातूर येथील सखी वन स्टॉप सेंटरने महिलांच्या जवळपास १ हजार तक्रारींचा निपटारा केला असून या कक्षाचे काम समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले. घराच्या पाटीवर पतीच्या नावासोबतच पत्नीचे नावही लावले जावे, यासाठी नांदेड जिल्हा परिषदेची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असताना मोहीम राबविली होती. आता लातूर येथे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना स्वामित्व योजनेची अंमलबजावणी करून पतीच्या नावासोबत पत्नीचे नावही सातबारा, आठ अ उताऱ्यावर लावले जावे, यासाठी प्रयत्न करीत असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. यासोबतच 'माझी मुलगी, माझा अभिमान' अभियान राबवून आपल्या मुलीचे नाव घराच्या पाटीवर लावण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे, असे त्या म्हणाल्या. कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी लातूर जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. यासाठी अंतर्गत तक्रार निवारण समिती अध्यक्ष, सदस्यांच्या कार्यशाळा घेण्यात आल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यावेळी म्हणाल्या. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'माझी मुलगी, माझा अभिमान' या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांना त्यांच्या मुलीच्या नावाची आकर्षक नेमप्लेट घरावर लावण्यासाठी भेट देण्यात आली. आपल्याला मुलीचा सदैव अभिमान आहे, मात्र अद्याप तिच्या नावाची नेमप्लेट घरावर लावावी, अशी कल्पना सुचली नव्हती. मात्र, आज तिच्या नावाची नेमप्लेट भेट मिळाल्यामुळे आपल्याला मनापासून आनंद वाटल्याचे आणि आनंदाने गहिवरून आल्याचे श्रीमती रहाटकर यांनी यावेळी नमूद केले. तसेच यासारख्या उपक्रमांमुळे मुलींच्या मनात आत्मविश्र्वास निर्माण होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले. प्रारंभी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख यांनी अंतर्गत समिती कामकाजाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे यांनी केले. तत्पूर्वी श्रीमती रहाटकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील हिरकणी कक्षाची पाहणी केली. तसेच येथील सुविधांबाबत कौतुक केले. विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मुलींचा, महिलांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यामध्ये सृष्टी सुधीर जगताप, अनिता दिलीप कुलकर्णी, अयोध्या शिवशंकर गुंजीटे, पटसाळगे रुक्मिणी गणेश यांचा समावेश होता.

## मुलींना मोफत शिक्षणाच्या निर्णयाची ...

संघटनांकडून समाजविघातक तसेच कट्टरपंथीय विचारसरणीला प्रोत्साहन मिळत आहे. त्यासाठी उपाय करावेत. बीड जिल्ह्यातील हत्येची घटना चिंताजनक असून परभणीतील घटनाही निंदनीय आहे. समाज विघातक प्रवृत्तीवर जरब बसवावी. महिला अत्याचाराच्या घटना वाढत असून त्या थांबवाव्यात, असे या प्रस्तावात म्हटले आहे. तिसऱ्या प्रस्तावात रोजगार निर्मितीची मागणी करण्यात आली आहे. जालना येथील ड्रायपोर्ट लवकर सुरू करावे. खानदेशातील बेरोजगारी दूर करण्यासाठी औद्योगिक गुंतवणूक वाढवावी. 'एक जिल्हा एक उत्पादन' यासारख्या योजना सामान्य नागरिक व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवाव्यात.नवे उद्योग सुरू करण्यासाठी एक खिडकी योजना सुरू करावी. कृषी उत्पादनावर आधारित उद्योग सुरू करावे, असेही या प्रस्तावात म्हटले आहे. प्रस्तावाच्या मंजुरीनंतर तीन दिवस चाललेल्या या अधिवेशनाची सांगता झाली.अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' या विषयावर शिक्षण तज्ञ प्रा.अनिल राव यांनी मार्गदर्शन केले.नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ.मनोहर चासकर यांची या सत्रास प्रमुख उपस्थिती होती. समारोप सत्रात परिषदेची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. मराठवाडा तसेच खानदेशातील विद्यार्थी प्रतिनिधी, प्राध्यापक प्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची या अधिवेशनास उपस्थिती होती.

## विनोद चव्हाण यांना मराठवाडा भूषण...

स्वातंत्र्यसंग्राम सेनानी म्हणून परिचित होते. हैदराबाद संस्थान व इंग्रजांविरुद्धच्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग होता. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भानुदासराव यांनी समाजसुधारणा व शिक्षण प्रसारासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या १ जानेवारी जयंती दिनाचे औचित्य साधून मागील अनेक वर्षापासून दरवर्षी मराठवाड्यातील उल्लेखनीय कार्यकरणाऱ्या आदर्श शिक्षकांना मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. सन २०२४ या वर्षासाठी राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचे शिक्षक विनोद चव्हाण यांच्या शिक्षण, पत्रकारिता, पर्यावरण, दिव्यांग व सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याची दाखल घेऊन मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. या पुरस्काराबद्दल विनोद चव्हाण यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

06 TO 12 JANUARY 2025 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 1/5/2025 6:02 PM Page 1




## ८ जानेवारीला उद्योग संचालनालयामार्फत निर्यात प्रचालन कार्यशाळेचे आयोजन

**पालघर/प्रतिनिधी**

विकास आयुक्त (उद्योग) यांच्या निर्देशानुसार राज्यामध्ये निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी आणि निर्यात वाढीला प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनवण्यासाठी राज्याकडून केंद्र शासनाच्या ,जिल्हा हे निर्यात केंद्र, या उपक्रमाला प्रोत्साहन देण्याकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये निर्यात प्रचालन कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. त्यानुसार जिल्हा उद्योग केंद्र पालघर यांच्या वतीने जिल्ह्यातील निर्यात प्रचालन कार्यशाळा बुधवार दि.०८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.०० वा हॉटेल रुद्रा शेल्टर इंटरनॅशनल, सातिवली वसई पूर्व या ठिकाणी आयोजित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक उपेंद्र सांगळे यांनी दिली आहे. जिल्हास्तरिय कार्यक्रमांमध्ये जिल्हातील प्रमुख उद्योग क्षेत्राबाबत चर्चासत्र, गुंतवणुकीच्या संधी, इतर क्षमता असलेल्या क्षेत्रातील गुंतवणुक व्यवसाय संधीबाबत चर्चा, यशस्वी निर्यातदार उद्योजकांचे अनुभव, निर्यात प्रोत्साहानांसाठी भारत सरकारच्या योजना व धोरणे, जिल्हयातील निर्यातीला चालना देण्यासाठी रोडमॅप आदींचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमास सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उत्पादक, केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, निर्यात संबंधित कामकाज करणारे घटक, शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, मिटकॉन, कौशल्य विकास व रोजगार व जिल्हातील संबंधित शासकीय यंत्रणांचे प्रमुख यांनी या कार्यशाळेस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्र, पालघर महाव्यवस्थापक उपेंद्र सांगळे यांनी केले आहे.

## भिवंडी महापालिका राजकारणात भिवंडी विकास आघाडी एकता मंचाची पुनः स्थापना, राजकीय वर्तुळात खळबळ!




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिका स्थापन झाल्या पासुन च्या सुरुवातीच्या दहा वर्षात महानगरपालिका सत्तेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या भिवंडी विकास आघाडी अर्थातच एकता मंचची पुनः स्थापना माजी महापौर जावेद दळवी यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी फक्की हॉल याठिकाणी आयोजित कार्यक्रमात करण्यात आली. या निमित्त आमदार महेश चौघुले आमदार शांताराम मोरे यांचा सन्मान सोहळा सुध्दा भिवंडी विकास आघाडीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी शुभेच्छा देण्यासाठी भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य आनंद गद्रे, शिवसेना शहर जिल्हाप्रमुख सुभाष माने, समाजवादी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष अजय यादव, माजी अध्यक्ष सलाम नोमानी, कॉंग्रेसचे माजी नगरसेवक वसीम अन्सारी, सहाफ मोमीन, तलाह मोमीन, इरफान अन्सारी, प्रशांत लाड, रिशिका राका, रोमा आळशी आदी मान्यवर व्यासपीठा वर उपस्थित होते. भिवंडी शहरातील वाहतूक समस्या, शहरातील डबघाईस आलेल्या यंत्रमाग व्यवसाय यावर लोकप्रतिनिधींनी आवाज उठवणे गरजेचे आहे. तीन वर्षापासून महानगरपालिका सभागृह अस्तित्वात नसल्याने अनेक समस्या उद्भवत आहे. अशा वेळी शहरवासीयांच्या समस्या मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ असणे गरजेचे आहे यासाठी भिवंडी विकास आघाडीची पुनः स्थापन करीत असल्याची भूमिका संयोजक जावेद दळवी यांनी व्यक्त केली.पालिकेच्या सुरवातीच्या दहा वर्षात भिवंडी विकास आघाडी सत्तेत असताना शहराच्या विकासाला हातभार लावण्यात यशस्वी झाली होती. त्यामुळे शहरात स्थानिक पक्ष असावा अशी सर्वांचीच मागणी आल्याने पुन्हा एकदा भिवंडी विकास आघाडी एकता मंच सुरू करीत आहोत अशी माहिती भिवंडी विकास आघाडीचे संयोजक माजी महापौर जावेद दळवी यांनी दिली आहे.यावेळी सत्काराला उत्तर देताना आमदार महेश चौघुले यांनी शहराच्या विकासात जात धर्म बघून नव्हे तर शहरवासीय यांच्या गरजा लक्षात घेऊन आपण काम करणार असल्याची भूमिका विषद केली. तर आमदार शांताराम मोरे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. माजी महापौर जावेद दळवी यांच्या नेतृत्वाखाली भिवंडी विकास आघाडी २००२ व २००७ या दोन्ही वेळच्या महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत चांगले यश मिळवले होते. भिवंडी विकास आघाडीने दोन्ही वेळा ११ नगरसेवक निवडून आणले होते.त्यातून २००७ मध्ये महापौर पद भिवंडी विकास आघाडीने कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस समाजवादी पार्टी पटकावले होते. परंतु त्यानंतर जावेद दळवी यांनी भिवंडी विकास आघाडी कॉंग्रेस मध्ये विलीन केली होती. मध्यंतरीच्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीतील कॉंग्रेस मधील स्थानिक राजकारणाला कंटाळून जावेद दळवी यांनी भिवंडी विकास आघाडीचे पुनर्जीवन केले आहे. शहराच्या राजकारणात विकास आघाडी च्या प्रवेशाने अनेक राजकीय पक्षांच्या गोटात खळबळ उडाली आहे.

## संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालयात विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न



**अहमदपूर/प्रतिनिधी**

अहमदपूर येथील संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशा रोडगे तर प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी वाघमारे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नवनाथ हांडे, माता पालक संघाच्या सहसचिव प्रियंका पारसेवार, सदस्या स्नेहा हांडे सह आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. नवनाथ हांडे व प्रियंका पारसेवार यांच्या वतीने सुंदर हस्ताक्षर स्पर्धेतील व भाषण स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक बालाजी वाघमारे, नवनाथ हांडे यांचे मनोगत पर भाषण झाले. आशा रोडगे यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतीश साबणे यांनी केले. सूत्रसंचालन मीना होनराव यांनी केले तर आभार सुजाता बुरगे यांनी मानले. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## कपिल पाटील आणि किसन कथोरे यांच्यातील अंतर्गत वाद थांबता थांबेना!



**भिवंडी/प्रतिनिधी**

माजी पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील व मुरबाडचे भाजप आ. किसन कथोरे यांच्यातील अंतर्गत वाद थांबता थांबत नाही.याची पुन्हा प्रचिती शुक्रवारी आली.शुक्रवारी भाजपच्या वतीने तालुक्यातील कोनगाव येथे आयोजित केलेल्या सभासद नोंदणी कार्यक्रमाप्रसंगी माजी केंद्रीय मंत्री पाटील व आ.कथोरे एकाच व्यासपीठावर आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी, पालघरचे खा.हेमंत सवरा, भाजप पदाधिकारी भरत पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे पाटील व कथोरे लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर प्रथमच एकाच व्यासपीठावर आले असल्याने त्यांच्यातील वाद शमला असल्याच्या चर्चा कार्यक्रमादरम्यान झाल्या. स्वतः खा.सवरा यांनी आपल्या भाषणावेळी पाटील व कथोरे एकत्र आल्याने भाजपला नवी उभारी मिळेल अशी प्रतिक्रिया दिली मात्र प्रत्यक्षात किसन कथोरे व कपिल पाटील एकमेकांशी कार्यक्रम संपेपर्यत काहीही बोलले नाही. व्यासपीठावर कपिल पाटील व किसन कथोरे यांच्या मधोमध खा.हेमंत सवरा बसले होते. कार्यक्रम संपल्यानंतर पाटलांनी त्यांच्या उजव्या बाजूला असलेल्या भाजप जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी यांना हस्तांदोलन केले, तर कथोरींनी त्यांच्या डाव्या बाजूला असलेल्या भाजप पदाधिकारी भरत पाटील यांच्याशी हस्तांदोलन केले व एकमेकांना पाठ दाखवत निघून गेले.

## रात्री लावलेले दुभाजक; संध्याकाळी तुटले



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरातील मुख्य रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी नियंत्रणात येण्यासाठी वाडा नगरपंचायतीने रात्रीच्या सुमारास दुभाजक उभारले होते मात्र एका वाहनचालकामुळे ते संध्याकाळीच आडवे झालेले दिसत आहेत. खंडेश्वरी नाका ते परळी नाका दरम्यान रस्त्याच्या दुतर्फा अनधिकृत भाजी, फळे व इतर वस्तू विकणारे व अवस्थाव दुचली व चारचाकी वाहने उभी केल्याने वाहतूक कोंडीची मोठी संस्या उद्भवली आहे. दुभाजक लावल्याने वाहन चालक नियमांचे पालन कारून आपली वाहने चालवतील, कुठेही वाहन उभी करणार नाहीत यासाठी रातोरात नगरपंचायतीने दुभाजक उभारले त्या बद्दल वाडा वाशियांनी समाज माध्यमांवर मुख्य अधिकारी व कर्मचाऱ्यांची वाहवा केली पण बेसिस्त वाहनचालकाने धडक दिल्याने एक दुभाचक आडवा झाला आहे, अवघ्या एकाच दिवसात दुभाजकाची अशी अवस्था होत असेल तर महिन्या भरात तरी हे दुभाजक राहतील का असा प्रश्न उपस्थित होत आहे. अशा वाहन चालकांवर कारवाई करून तुटलेला दुभाजक काढून त्वरित दुसरा दुभाजक लावण्याची मागणी होत आहे.

## रात्रभर अवैध रेती वाहतूक करणाऱ्या टिपरवर कारवाई नाही मात्र ट्रॅक्टरवर

**पाथरी/प्रतिनिधी**



तालुका हा अवैध वाळू उपस्यासाठी ओळखला जाणारा तालुका आहे. कारण पाथरी तालुक्यामध्ये गोदावरी नदीचे पात्र मोठे असून सदरील महसुलाचे वरिष्ठ अधिकारी यांची तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा पाहता मुखसंमती असल्याचे दिसून येत आहे. पाथरी तालुक्यातील पाटोदा ते मुद्गल पर्यत असे गोदावरी नदीचे पात्र असून सध्याच्या काळामध्ये गोदावरी नदीमध्ये बऱ्याच ठिकाणी पाणी असल्याने त्या ठिकाण अत्याधुनिक मशीन व केणीच्या, तराफ्याच्या साह्याने मोठ्या प्रमाणावर वाळूचा उपसा सुरू आहे. त्यामध्ये पाटोदा मरडसगाव, गुंज, उमरा, गोंडगाव, मुदगल, लिंबा आनंदनगर तांडा इत्यादी ठिकाणी वाळू उपसा मागील १५ ते २० दिवसापासून शेकडो ब्रास वाळूचा उपसा चालू असताना पाथरी महसूल गौण खनिज विभागाकडून कुठलीही मोठी कारवाई अद्याप तरी झालेली नाही. पाथरी तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर चालू असलेल्या वाळूची वाहतूक रात्रीच्या वेळी हायवा, टिप्पर, ट्रक, ४०७ च्या साह्याने खुलेआम सायकांळी सहा ते सकाळी सहा वाजेपर्यत या अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांचा सुळसुळाट असताना या वाहनांवर मात्र कारवाई न करता पाथरी महसूल प्रशासनाकडून दोन दिवसांपूर्वी दोन ट्रॅक्टर वर कारवाई करण्यात आली. असून रात्रीच्या वेळी तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर चालू असलेल्या अवैध वाळु वाहतुक हायवा, ट्रक, टिप्पर यांच्यावर कारवाई कधी होणार हा प्रश्न जनसामान्यांना पडला आहे.

## वाकी ग्रामपंचायतीत महिला मेळाव्याचे आयोजन



**डहाणू/प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्पाच्या आशागड-२ बीट अंतर्गत वाकी ग्रामपंचायतीमध्ये भव्य महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. आमदार विनोद निकोले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच, जिल्हा परिषद सदस्य जयंवत डोंगरकर, सरपंच दिनेश दयात, ग्रामपंचायत सदस्य सावित्री कान्हात यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात महिलांसाठी आहार प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करण्यात आले. याशिवाय, सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत स्थानिक महिलांनी पारंपरिक नृत्य आणि 'तारका' नृत्याचे उत्कृष्ट सादरीकरण केले. कार्यक्रमाने महिला सक्षमीकरणासाठी प्रेरणा दिली आणि ग्रामीण भागातील महिलांमध्ये जागरूकता निर्माण केली. या मेळाव्याचे आयोजन यशस्वी करण्यासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी व स्थानिक ग्रामपंचायतीने विशेष परिश्रम घेतले. महिलांच्या प्रतिसादामुळे कार्यक्रमाने वेगळा रंग घेतला असून समाजाच्या प्रगतीसाठी असे उपक्रम महत्त्वाचे ठरत असल्याचे प्रतिपादन यावेळी आमदार विनोद निकोले यांनी केले. यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी सतीश पोळ, प्रशिक्षण नागेश संखे आणि डॉ.धीरज महाले यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

## मुंबई नाशिक महामार्गावर कारला आग



**ठाणे/प्रतिनिधी**

मुंबई नाशिक महामार्गावरील दिवे अंजूर भागात सोमवारी सकाळी एका कारला अचानक आग लागली. या घटनेमुळे परिसरात वाहतुक कोंडी झाली आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी या मार्गावर खारेगाव टोलनाका ते मानकोली पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. कोंडी सोडविण्याचे कार्य सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मुंबई नाशिक महामार्गावरून दिवसाला हजारो वाहनांची वाहतुक होत असते. मुंबईहून नाशिक, भिवंडी, कल्याणला जाण्यासाठी वाहन चालक याच मार्गाचा वापर करतात. तसेच मुंबई, नवी मुंबई आणि ठाण्याच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांचीही वाहतुक या मार्गावर अधिक असते. सोमवारी सकाळी मुंबई नाशिक महामार्गावरून कार नाशिकच्या दिशेने वाहतुक करत होती. ही कार दिवे अंजूर भागात आली असता, अचानक कारच्या पुढील भागात आग लागली. या घटनेनंतर परिसरात वाहतुक कोंडी झाली. त्याचा परिणाम येथील वाहतुक व्यवस्थेवर झाला. खारेगाव टोलनाका ते मानकोली पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. घटनेची माहिती ठाणे वाहतुक पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. वाहतुक कोंडी सोडविण्याचे कार्य पथकाकडून सुरू आहे. मात्र आता आगीवर नियंत्रण मिळविले आहे आणि कोंडी सुटली आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### नागरसोगा शिवारात सोयाबीनच्या ७७ पोत्यांची चोरी

औसा : औसा तालुक्यातील नागरसोगा येथील शेतकऱ्याचे पावणेदोन लाखाचे सोयाबीनचे ७७ पोतीची चोरी झाल्याची घटना घडली आहे. सोयाबीनची काढणी करून शेतातील पत्राच्या शेडमध्ये ठेवलेले ७७ पोती सोयाबीन चोरीस गेले आहे. चोरीस गेलेल्या सोयाबीनची किंमत अंदाजे एक लाख साठ हजार असून, याप्रकरणी औसा पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. औसा तालुक्यातील नागरसोगा येथील शेतकरी धनराज काशीनाथ मुसांडे यांनी बुधवारी सायंकाळी शेतातील कामे संपवून गावातील घराकडे परत आले. दुसऱ्या दिवशी सकाळी ते आणि त्यांचे सालगडी शेताकडे गेले असता, सोयाबीन ठेवलेल्या १२० सोयाबीनच्या पोत्यापैकी काही पोती कमी झाल्याचे दिसले. खात्री करण्याकरिता मोजणी केली असता ७७ पोती कमी झाल्याचे आढळून आले. बुधवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी ७७ पोती सोयाबीनची चोरी केली असून अंदाजे ४० क्विंटल वजनाचे ०१ लाख ६० हजार किमतीचा माल चोरीस गेला आहे. सोयाबीनला अपेक्षित भाव मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी अजूनही आपले सोयाबीन विक्रीस न काढता साठवून ठेवले आहे. याचा फायदा घेऊन चोरट्यांनी सोयाबीनवर डल्ला मारले आहे. अगोदरच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. चोरी गेलेल्या सोयाबीन प्रकरणी औसा ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून, तपास दिनेश गवळी करत आहेत. गेल्या १५ ते २० दिवसांपासून अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील मोटारी, केबल वायर, शेती साहित्य चोरीला गेल्याच्या घटना घडल्या असून, पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून करण्यात येत आहे.

### व्हाईस ऑफ मिडीयाच्या लातूर जिल्हाध्यक्ष पदी संगम कोटलवार

लातूर : व्हाईस ऑफ मिडीया लातूर जिल्हाध्यक्षपदासाठीची निवडणूक २०२४-२५ ची प्रक्रिया नुकतीच पार पडली. या निवडणूक प्रक्रियेमध्ये लातूर जिल्हाध्यक्ष पदासाठी दै.सारथी समाचारचे संपादक संगम कोटलवार यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे निवडणूक अधिकारी अजित कुंकुलोळ यांनी संगम कोटलवार यांनी लातूर जिल्हाध्यक्ष पदी बिनविरोध निवड केली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल व्हाईस ऑफ मिडीयाचे अध्यक्ष संदिप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, मुख्य संयोजक योगेंद्र दोरकर, प्रदेश उपाध्यक्ष अजित कुंकुलोळ प्रदेश कार्याध्यक्ष विजय चोरडिया, बालाजी फड, शहाजी पवार, बाळासाहेब जाधव, श्रीराम जाधव, आनंद माने, सचिन चांडक, सुभाष सगर, योगीराज पिसाळ, विनोद चव्हाण यांच्यासह पदाधिकार्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत वाचन कौशल्य कार्यशाळा

लातूर : जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व साने गुरुजी शैक्षणिक संकुल लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा'उपक्रमांतर्गत 'वाचन कौशल्य कार्यशाळा' आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कालिदास माने यांनी केले. या कार्यक्रमाचे स्वरूप व उददेश याबाबत उपस्थितांना अवगत केले. व्याख्याते म्हणून जेष्ठ कवी भारत सातपुते यांनी वाचनाबद्दल रुची व लेखन कौशल्य याविषयी मार्गदर्शन केले. तसेच वेगवेगळी उदाहरणे देवून चांगले जीवन जगण्यासाठी, ज्ञान वृध्दीगंत करण्यासाठी वाचनाची आवश्यकता का आहे याचे महत्व उपस्थित विद्यार्थ्याना पटवून दिले. त्याचबरोबर कार्यक्रमांच्या अध्यक्ष तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी वाचनाचे महत्त्व, उद्दिष्ट समजावून सांगितले. नवीन वर्षानिमित्त दररोज एक तास अवांतर वाचन करण्याचा संकल्प करावा. तसेच शासकीय ग्रंथालयातील ग्रंथसंपदेचा लाभ घेण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांनी शासकीय ग्रंथालयाचे सभासदत्व घेण्याबाबत आवाहन केले. कार्यशाळेत साने गुरूजी शैक्षणिक संकुलातील एकूण १५० विद्यार्थ्यानी सहभाग नोंदवून पुस्तकाचे सामूहिक वाचन केले. प्रत्येक विद्यार्थ्यास वेगवेगळे ग्रंथ वाचनासाठी देण्यात आलेले होते. या कार्यक्रमास जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील सुधीर आचार्य, हि.भ पाटील, तसेच साने गुरूजी शैक्षणिक संकुलातील मुख्याध्यापक शिक्षक व इतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शालेय शिक्षण विभाग प्रयत्नशील-दादाजी भुसे

**पालघर/प्रतिनिधी**



राज्यातील प्रत्येक विद्यार्थांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे हा दृष्टिकोन समोर ठेऊन शालेय शिक्षण विभाग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार आहे, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी या कार्यक्रमावेळी सांगितले. डहाणू तालुक्यातील ऐने येथील ग्राममंगल संचलित मुक्त शाळा या विद्यालयास शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी भेट देऊन पाहणी केली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या सदस्या वैदेही वाढाण, ग्राममंगल संस्थेचे रमेश पानसे हेरंब कुलकर्णी, सचिन जोशी, श्याम सोनवणे तसेच अधिकारी शालेय शिक्षक, आणि विद्यार्थी उपस्थित होते. शिक्षणाच्या विविध पद्धतीच्या माध्यमातुन आनंददायी शिक्षण विद्यार्थ्यांना आपण कशा प्रकारे देऊ शकतो तसेच शिक्षण विभागामध्ये प्रदीर्घ कार्य करणाऱ्या शिक्षण तज्ञ शिक्षण क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या विविध संस्था यांच्या सूचना विचारात घेऊन शैक्षणिक धोरण आखले जाणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. राज्यातील विविध शैक्षणिक संस्था मधील शिक्षकांशी तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून त्या अडचणी दूर करण्यासाठी शालेय शिक्षण विभाग प्रयत्नशील असणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी सांगितले.




## ज्येष्ठ नागरिक समाजाचा महत्वाचा घटक, त्यांची काळजी घेण्याची गरज -आशुतोष डुंबरे




**भिवंडी/प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिक हे समाजातील महत्त्वाचे घटक आहेत त्यांच्याही वेगवेगळ्या समस्या आहेत त्या जाणून घेत असताना त्यांच्या अडचणी सोडवण्याचे त्यांना आधार देण्याचे कर्तव्य सुद्धा पोलिसांचे आहे असे प्रतिपादन ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी केले आहे.ते भिवंडी पोलिस उपायुक्त परिमंडळ वतीने भादवड येथील कै.संपदा नाईक सभागृहात आयोजित जेष्ठ नागरिक संवाद मेळावा व आरोग्य तपासणी शिबिर प्रसंगी बोलत होते. या वेळी व्यासपीठावर अप्पर पोलीस आयुक्त विनायक देशमुख, पोलिस उपायुक्त डॉ मोहन दहीकर जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष जयंत सोनटक्के तर कार्यक्रमास मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिक उपस्थित होते. जेष्ठ नागरीकांच्या वय वाढत आहे भविष्यात ते ७० वर्षावर जाणार आहे. जेष्ठ नागरीकांच्या समस्या वेगळ्या पद्धतीने हाताळण्याची गरज आहे. त्यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या संपलेल्या नसतात. अशा वेळी एकटे राहणाऱ्यानी काळजी घेण्याचे सांगत जेष्ठ नागरिकांच्या समस्या वेगळ्या पद्धतीने हाताळाव्या लागतात. घरात कामाला ठेवणाऱ्या व्यक्तींची पोलिसांकडून पडताळणी करण्याची गरज आहे. जेष्ठ नागरिकांची सेवा करणे हे पोलिसांसाठी कर्तव्यासह पुण्याचे काम आहे नगा रतआयव्हेरिफिकेशन करणे गरजेचे असल्याने जेष्ठ नागरिकांना पोलीस प्रशासना कडून विश्वास देण्याचं काम केलं जात आहे असे शेवटी आशुतोष डुंबरे यांनी सांगितले. महाराष्ट्र पोलीस ...पान ६ वर

## महिला सुरक्षा, सायबर गुन्हे व वाहतूक सुरक्षेसाठी पोलीस सक्षम - संजय दराडे



**वाडा/प्रतिनिधी**

महिला सुरक्षा संरक्षण, सायबर गुन्हे, बाल लैंगिक गुन्हे व वाहतूक सुरक्षेसाठी महाराष्ट्र पोलीस सक्षम असल्याचे मत विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परीक्षेत्र संजय दराडे यांनी व्यक्त केले ते वाडा पोलीस ठाणे यांच्या वतीने आयोजित जनसंवाद अभियान अंतर्गत विद्यार्थी जनसंवाद कार्यक्रमात बोलत होते. २ जानेवारी हा महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन असून हा दिवस पोलीस दला कडून रायझिंग डे म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने दराडे यांनी विद्यार्थ्यासी मनमोकळे पणाने संवाद साधला तर विद्यार्थ्यांनी ही उत्तम प्रतिसाद दिला. त्यांनी आपल्या भाषणात वाड्यातील महिला पोलीस उपनिरीक्षक यांचे उदाहरण देऊन यांच्या कडून प्रेरणा घेऊन अथक मेहनत, अभ्यास करून असे अधिकारी होऊन दाखवा असे आवाहन विद्यार्थिनींना केले. तर बोईसर उपविभागीय पोलीस अधिकारी विलास नाईक यांनी वाहतूकी बाबत नियम सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना शस्त्र दाखवून त्यांची माहिती देऊन ओळख करून दिली तर पोलीस कोठडी दाखवून पोलिसांच्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी सातारा येथील ज्ञानराज कला मंचच्या कलाकारांनी पथ नाट्य सादर करून सायबर गुन्ह्यांना बाबत जनजागृती केली. कार्यक्रमाचे प्रस्थावना पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांनी केले तर कार्यक्रमाचा समारोप व आभार प्रदर्शन पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांच्यासह वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## विनोद चव्हाण यांना 'मराठवाडा भूषण' पुरस्कार प्रदान

**लातूर/प्रतिनिधी**

येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचे शिक्षक विनोद चव्हाण यांना मराठवाडा समन्वय समिती पुणे, यांच्यातर्फे देण्यात येणारा २०२४ या वर्षीचा 'मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२४' देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराचे वितरण बुधवार (१ जानेवारी १,२०२५) रोजी तुळजापूर येथे पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित भव्य कार्यक्रमात झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड. जी. आर. देशमुख (अध्यक्ष, थोर स्वा. से. रामानंद तीर्थ स्मारक व सेवाभावी संस्था, परभणी) उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. श्रीमंत कोकाटे, मराठवाडा



समन्वय समितीचे अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योजक राजकुमार धुरगुडे, स्वातंत्र्यसंग्राम सेनानी भानुदासराव जयवंतराव धुरगुडे जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष महेंद्र काका धुरगुडे, पंचायत समिती तुळजापूरचे गटविकास अधिकारी अमोल ताकभाते यांची उपस्थिती होती. मराठवाडा समन्वय समिती पुणे, ही एक मराठवाड्याच्या सर्वांगिण विकासासाठी कार्य करणारी समाजिक सेवाभावी संस्था आहे. ही संस्था मागील अनेक वर्षापासून पुणे व मराठवाडा येथे विविध सामाजिक उपक्रम राबवीत आहे. दिवंगत भानुदासराव धुरगुडे हे मराठवाड्यातील अग्रणी ...पान ६ वर

## कामाच्या ठिकाणी महिलांकरिता सुरक्षित वातावरण निर्माण करणे प्रत्येकाची जबाबदारी-विजया रहाटकर

**लातूर/प्रतिनिधी**

प्रत्येक शासकीय, अशासकीय कार्यालयांमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे. याविषयी कार्यालयातील प्रत्येक सहकाऱ्याची जबाबदारी महत्वाची असल्याचे राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी सांगितले. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत कार्यालयांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या अंतर्गत तक्रार निवारण समिती अध्यक्ष सदस्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत त्या बोलत



होत्या. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक ...पान ६ वर

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहत संपन्न




**वाडा/प्रतिनिधी**

भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, स्त्री शिक्षणासाठी आपल संपुर्ण आयुष्य सत्कारणी लावलेल्या ज्ञानाईला अभिवादन करण्यासाचा दिवस या दिवसाच्या निमित्ताने वाडा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा येथे भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी वक्तृत्व, नृत्य व वेशभूषा हे कार्यक्रम सादर केले. सदर कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, मुख्याध्यापक व महिला पालक उपस्थित होते.

## मुलींना मोफत शिक्षणाच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करा; अभाविप देवगिरी प्रदेश अधिवेशनात ठराव; तीन दिवस चाललेल्या अधिवेशनाची सांगता

**लातूर/प्रतिनिधी**

मुलींना मोफत शिक्षण देण्याचा चांगला निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. परंतु अनेक महाविद्यालये त्याची अंमलबजावणी करत नाहीत. राज्य सरकारने या निर्णयाची प्रभावीपणे अमलबजावणी करावी, असा ठराव लातूर येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रांताच्या ५९ व्या अधिवेशनात संमत करण्यात आला. दि. २ ते ४ जानेवारी या कालावधीत लातूर येथे अभाविप देवगिरी प्रदेशाचे ५९ वे अधिवेशन संपन्न झाले. या अधिवेशनात शैक्षणिक सद्यस्थिती, सामाजिक सद्यस्थिती आणि 'स्वयंरोजगार व रोजगार निर्मिती तसेच उद्योजकता विकासाकडे युवकांची ओढ निर्माण करण्यासाठी सरकारने आखावा कृती आराखडा' असे तीन प्रस्ताव संमत करण्यात आले. शैक्षणिक परिसराच्या ५०० मीटर अंतरात




तंबाखूजन्य पदार्थाची तसेच अमली पदार्थाची विक्री करण्याच्या घटना उघड झाल्या आहेत, त्यावर निर्बंध घालावेत. महाविद्यालयात पायाभूत सुविधा वाढवाव्यात. रिक्त जागी प्राध्यापकांची भरती करावी. औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील उपकरणांचे नूतनीकरण करावे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीची कारणे शोधावी. पेपरफुटीला आळा घालावा. वसतीगृहांची सुरक्षा वाढवावी. राज्यात एआय प्रयोगशाळा वाढवाव्यात, असे शैक्षणिक ठरावात म्हटले आहे. सामाजिक सद्यस्थितीवरील ठराव मंजूर करताना देशविरोधी प्रवृत्तीला आळा घालावा, ही मागणी करण्यात आली. राज्यात तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्ती व ...पान ६ वर